# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### धुळे जिल्ह्यासह राज्यातील अनेक शेतकऱ्यांना बँकांमार्फत मिळणारे पीक कर्ज वेळेवर मिळत नसल्याबाबत

**(१) ३२५४९ (२५-११-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यासह राज्यातील अनेक शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी बँकांमध्ये वारंवार जाऊन देखील शेतकऱ्यांना वेळेवर पीक कर्ज उपलब्ध होत नसल्याचे माहे ऑगस्ट २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीक कर्जासाठी लागणाऱ्या अर्जाची व कागदपत्रांची पूर्तता करुन देखील शेतकऱ्यांच्या अर्जात त्रुटी दाखवून पिक कर्ज बँकांकडून नाकारले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील शेतकऱ्यांना वेळेवर पीक कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (०९-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) खरीप हंगाम २०२१-२२ करीता धुळे जिल्ह्यातील विविध बँकांनी एकूण ४३,७७२ सभासदांना ४८३.७१ कोटीचे कर्जवाटप केलेले आहे. हे प्रमाण एकूण लक्षांकाच्या ७१ % इतके आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचे पिक कर्ज माफ करण्याबाबत

**(२) ३५१९९ (१२-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी तालुक्यासह (जि. गडचिरोली) संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात माहे जुलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ केले नसल्याची माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसुल व वन विभाग शा.नि.क्र.सीएलएस-२०२१/प्र.क्र.१६५/म-३, मंत्रालय मुंबई दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी व त्या सुमारास पिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी १ हेक्टरच्या मर्यादेत पीक कर्ज माफ करण्याबाबत सहकार विभागाने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ६७-आरमोरी तालुक्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संपुर्ण गडचिरोली जिल्ह्यात माहे जुलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पिक कर्ज माफ करण्यासाठी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २ ऑक्टोबर, २०२१ रोजी व त्या सुमारासच्या निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (०७-०३-२०२२) :** (१), (२) व (३) होय, खरे आहे.

(४) दिनांक ११.०९.२०२० च्या शासन निर्णयान्वये माहे जुलै-ऑगष्ट २०१९ मधील अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकाचे नुकसान झाल्याने बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदतीकरीता निधी प्राप्त झाला होता. सदर प्राप्त निधीच्या अनुषंगाने आरमोरी मतदारसंघातील अतिवृष्टी व पुरामुळे बाधीत ३११ गावातील १०,९८५ शेतकऱ्यांना रु. ९.८३ कोटीचा लाभ देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ''ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले'' यांच्या नावाने महिला वसतीगृहे उभारण्याबाबत**

**(३) ३७७०८ (०९-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले" यांच्या नावाने ७२ महिला वसतीगृहे राज्यात उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतीगृहात एनडीए व स्पर्धा पूर्व परिक्षा, निवासी प्रशिक्षण घेण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संकुलांसाठी ओबिसी विभाग व शासनाने किती कोटी रुपयांच्या निधीचा आराखडा तयार केला आहे, तसेच या आराखड्यास मंजूरी देण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०८-०६-२०२२) :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून राज्यातील इतर मागासवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ वसतिगृहे सुरू करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक-इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१ दि.३०.०१.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत वसतिगृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध झालेल्या नागपूर,अहमदनगर, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**पुणे जिल्ह्यात वडगावशेरी मतदार संघात लोहगाव विमानतळामध्ये**
**स्थानिक नागरिकाच्या जमिनी संपादित केल्याबाबत**

**(४) ३९८५५ (०७-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात वडगावशेरी मतदार संघात लोहगाव विमानतळामध्ये स्थानिक नागरिकांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपादित केलेल्या जमिनीपैकी किती नागरिकांना त्याचा मोबदला मिळाला आहे त्याची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भूसंपादनाचा मोबदला मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे लोहगाव,ता.हवेली,जि.पुणे येथील विमानतळासाठी तीन भूसंपादन प्रस्तावान्वये जमीनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. त्याचा नुकसान भरपाई वाटपाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ) मौजे लोहगाव विमानतळासाठी भूसंपादन अंतिम निवाड एस आर क्र. ३/७५, दिनांक ३१.१२.१९८३ अन्वये ४ हे.४७ आर क्षेत्र संपादीत झाले असून एकूण ४१ खातेदारांपैकी ३७ खातेदारांना त्यांचे ४ हे.४४ आर क्षेत्राची नुकसान भरपाई रक्कम वाटप करण्यात आली आहे. नुकसान भरपाई रक्कम वाटप करतेवेळी ४ खातेदार गैरहजर असल्याने त्यांचे ० हे. ०३ आर क्षेत्राची नुकसान भरपाई वाटप झालेली नाही.

ब) मौजे लोहगाव विमानतळासाठी भूसंपादन अंतिम निवाडा एस आर क्र.९/७४, दिनांक ३०.०९.१९८६ अन्वये एकूण ० हे. ७३ आर क्षेत्र संपादीत झाले असून निवाड्याची संपूर्ण रक्कम सर्व ६ खातेदारांना वाटप केली आहे.

क) लोहगाव विमानतळ धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी गट क्र. २४५ मधील ८ हे. ५६ आर तसेच सदर क्षेत्राचा आगाऊ ताबा घेतला आहे. परंतु सदर एकूण जमीन, जमीनविषयक मूल्यांकनाच्या ८०% रक्कम जमीनीच्या मालकी हक्काबाबत वाद असल्याने व सदर जमीन देवस्थान इनामाची दिसून येत असल्याने, मा.जिल्हा न्यायालयात जमा करण्यात आली आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर सदर आगाऊ ताब्याची रक्कम व अंतिम निवाड्याची रक्कम वाटप करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहाबाज (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील पी.एन.पी. कंपनीने शासकीय जमिनीवर केलेले विनापरवाना बांधकाम

**(५) ४०२५० (०५-०४-२०२२). श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहाबाज (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील पी.एन.पी. कंपनीने शासकीय जमिनीवर विनापरवाना दोन मजली इमारतीचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यानंतर ते तोडण्याबाबत शासनाच्या महसूल विभागाने जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ९ मे, २०१२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बेकायदेशीर इमारतीचे बांधकाम तोडण्याची कार्यवाही रायगड जिल्हाधिकारी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) पी.एन.पी. मेरीटाईम सर्व्हिसेस कंपनीने शासकीय जमिनीवर केलेले बेकायदेशीर बांधकाम तोडण्याबाबत शासन पत्र दिनांक ०३.०८.२०१२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले होते.

सदर बांधकाम तोडण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड यांचे मार्फत करण्यात आलेली नाही. मात्र तहसिलदार, अलिबाग यांनी मे.पी.एन.पी. मेरीटाईम सर्व्हिसेस प्रा.लि. यांना कंपनीने विनापरवाना औद्योगिक वापर चालू केल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ नुसार रक्कम रु.१,५२,५२,१६०/- शासन जमा करणेबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुषंगाने एकूण रु.५५,००,०००/- सदर कंपनीने शासनजमा केले असून उर्वरीत रक्कम रु.९७,५२,१६०/- वसूल करण्याची कार्यवाही तहसिलदार, अलिबाग यांचेकडून सुरु आहे.

तसेच सन २००८-२००९ ते २०१९-२०२० या कालावधीतील अनधिकृत बिनशेती वापराच्या अनुषंगाने उक्त कंपनीकडून रक्कम रुपये ८६,८३,८३०/- शासन जमा करण्यात आली आहे.

एकूण १६-९४.० हे.आर जमीन पी.एन.पी. मेरीटाईम सर्व्हिसेस कंपनीच्या विहिवाटीखाली असल्याने, सदरचे क्षेत्र त्यांना भाडेपट्टयाने देणेकरीता सदरचे क्षेत्र महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांनी दिनांक २९.०३.२०१२ व दिनांक ०४.०४.२०१२ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासनस्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.

मौजे शहाबाज, ता.अलिबाग जि.रायगड येथे मे.पी.एन.पी मेरीटाईम प्रा.लि.शहाबाज या कंपनीने कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता केलेला शासकीय मिळकतीचा वापर व केलेले बांधकामाबाबत मा.राष्ट्रीय हरित न्यायालय, बेंच पुणे यांचेकडे दाखल अर्ज क्र.९५/२०१४ मध्ये संकीर्ण अर्ज क्र.२६३/२०१७ च्या संदर्भात दि.२२.०९.२०१७ रोजी पारीत आदेश क्र.३१ मध्ये सदर बांधकामाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत कोणतेही आदेश पारीत नसल्याने सदर आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन मिळणेकामी जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १२.०८.२०२२ च्या पत्रान्वये पर्यावरण विभाग यांचेकडे विनंती केली आहे. सदर मार्गदर्शन प्राप्त होताच नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**वाडी (बु) (ता.जि.नांदेड) येथे सर्व्हे अभिलेखात छेडछाड करून तलाठी व तहसीलदार यांनी अनियमितता करून भ्रष्टाचार केल्याबाबत**

**(६) ४१६२३ (०७-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.वाडी (बु), ता.जि.नांदेड येथील सर्वे नंबर १४/A/१ मध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार करून १४/A/२ तयार करुन त्यावर चुकीच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत तसेच कुठलाही फेर आधार नसताना नावे कमी केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर वारसांची नावे कुठल्या फेर आधारे कमी केली गेली व चुकीच्या नोंदी कशाच्या आधारे घेण्यात आल्या ह्याचा कोणताही पुरावा(तपशील) नसल्याचे देखील संबंधित तलाठी सज्जा वाडी बु व तहसील कार्यालय नांदेड यांच्याकडे नसल्याची माहिती, माहिती अधिकारात व इतर अर्जात स्पष्ट झाल्याचेही निदर्शनांस आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बेकायदेशीर प्रकरणाच्या सर्व पुराव्याचा माहितीवरून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड, तहसील कार्यालय नांदेड तसेच तलाठी कार्यालय सज्जा वाडी बुद्रुक यांनी हे अभिलेख ठेवण्यात चूक करून यात प्रचंड प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व्हे अभिलेखात कमी करण्यात आलेले नावे पुनर्स्थापित करून दोषी असणाऱ्या तलाठी,तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मौजे वाडी (बु,) ता.जि.नांदेड येथील स.न. १४/A च्या गाव नमुना नं. ७/१२ चे सक्षम प्राधिका-याच्या आदेशाशिवाय तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी यांनी सर्वे नं. १४/A/१ व १४/A/२ या दोन गाव नमुना नं. ७/१२ मध्ये विभाजन केले आहे. परंतू एकूण क्षेत्रफळामध्ये कोणताही फेरबदल केलेला नाही. या विभाजनाबाबतची कोणतीही संचिका तलाठी कार्यालय /तहसील कार्यालय येथे आढळून आलेली नाही.

(४) व (५) मौजे वाडी (बू,) ता. जि. नांदेड येथील स.नं. १४/A/२ मधील अशोकराव आनंदराव पावडे यांचे वारस म्हणुन अनिकेत अशोकराव पावडे यांचे नावे असलेली जमीन ६० आर. कमी करण्यात आली.

मौजे वाडी बू, सर्वे नं. १४/A/२ मध्ये आनंदराव तातेराव पावडे यांना पुढील प्रमाणे चार वारस आहेत. (१) अशोक आनंदराव पावडे (२) किशोर आनंदराव पावडे (३) संतोष आनंदराव पावडे (४) मिनाक्षी प्रकाशराव देशमुख (सुर्यवंशी) त्यापैकी केवळ अशोक आनंदराव पावडे यांचेच नावे पूर्ण जमीन लावल्याबाबत कलम १५५ नुसार दुरूस्ती करावी असा अर्ज संतोष पावडे यांनी दिला. त्यावरून प्रकरणात तहसीलदार नांदेड यांनी सुनावणी घेवून त्याचेकडील आदेश दिनांक ०९/०६/२०२१ अन्वये अशोकराव पावडे वारस अनिकेत अशोकराव पावडे यांच्या नावावरील (विक्री) झालेली सोडून शिल्लक ६० आर. जमीन इतर (३) वारसाचे नावे करणे बाबत आदेश देवून अंमलबजावणी केली आहे.

तसेच अशोक आनंदराव पावडे यांनी नोंदणीकृत खरेदीखताआधारे विक्री केलेल्या जमिनीचे फेरफार चुकीच्या गटात नाव नोंदणी केल्यामुळे ते रद्द करण्यासाठी अर्जदार श्री. संतोष आनंदराव पावडे यांनी विक्री केलेल्या १ हेक्टर पैकी ७७.८३ आर क्षेत्राच्या विक्री बाबत त्यांनी (३६) अपील दाखल केले आहे. त्यानुषंगाने अपीलाधीन फेरफार उपविभागीय अधिकारी नांदेड यांनी रद्द केले आहेत. सदर आदेशाविरुध्द (१९) अपील प्रकरणात अपर जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे सुनावणी चालू आहे.

प्रकरणात तत्कालीन तलाठी श्री. विजय येरावाड सध्या नायब तहसीलदार, व तत्कालीन मंडळ अधिकारी श्री. जी.डी. काकडे, नांदेड ग्रामीण सध्या सेवानिवृत्त (दिनांक ३१/०७/२०११) यांनी सक्षम प्राधिका-याच्या आदेशाशिवाय गाव नमुना नं. ७/१२ चे विभाजन केल्यामुळे त्यांच्याविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना दिनांक ३०/११/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील देवस्थान जमिनीबाबत

**(७) ४२६१२ (१२-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील सर्वे.नं. ३५८/३५९ ही जमीन देवस्थानाची आहे व सदर जमिनीचा शासनास नजराणा न भरता प्लॉट खरेदी विक्री होत असल्याबाबत श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी तहसीलदार, अंबाजोगाई यांना तक्रार अर्जासोबत शासनाचे नियम/निर्णय, त्यांच्या पत्रासोबत दिले होते तसेच सदर तक्रार अर्ज शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे त्यात नमूद करुनही तहसीलदार यांनी त्यांचा अर्ज कोणतेही कारण न देता नामंजूर केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदार यांनी अर्ज नामंजूर केल्यानंतर सदर प्रकरणी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे वकीलामार्फत मुदतीच्या आत श्री. मुंदडा यांनी अपीलही दाखल केली व सदर प्रकरणात उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे तारखाही झाल्या परंतु उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनीही Not Before Me माझ्या समोर नाही करून प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठवले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानीक लोकप्रतिनिधी यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर तहसीलदार यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक ०७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास अहवाल दिला त्यात सर्वे.नं. ३५८ चा नजराणा भरून घेणे आवश्यक असल्याचे लिहिले आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तहसीलदार यांच्या अहवालावरून श्री. नंदकिशोर मुंदडा यांची तक्रार व अपील खरी होती व शासनाचे आर्थिक नुकसान रोखणारी होती. उपजिल्हाधिकारी व तहसीलदार, अंबाजोगाई. यांनी फक्त राजकीय दबावापोटी स्वता:चे कर्तव्य विसरून निर्णय न घेता शासनाचे महसुली नुकसान केले हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी श्री. नंदकिशोर मुंदडा यांच्या तक्रार सत्य असल्याचे तहसीलदार यांच्या अहवालावरून सिद्ध होते तरीही त्यांचा तक्रारी अर्ज नामंजूर करण्यात आला हे नियोजित त नसून असंविधानिक आहे त्यामुळे वरील सर्व प्रकरणाची चौकशी करून तहसीलदार, अंबाजोगाई व उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई. यांच्यावर कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ०९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून तहसीलदार, अंबाजोगाई. व उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) अंबाजोगाई, जि.बीड. येथील स.नं.३५८/ ३५९ ची नोंद गाव नमूना ३ मध्ये नाही. तसेच, स.नं.३५८/ ३५९ मध्ये झालेल्या खरेदीखताच्या आधारे तलाठी स्तरावर फेरफाराची नोंद झाल्यानंतर सदरील तक्रार प्राप्त झाली. या तक्रारीच्या आधारे तहसीलदार, अंबाजोगाई यांच्या स्तरावर सुनावणी घेण्यात

आली. तक्रारदारांचा अर्जावर खरेदीखताच्या आधारे घेण्यात आलेले फेरफार मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे चालू असलेल्या प्रकरणाच्या अधीन राहून दिनांक ०७.०६.२०२१ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आले.

(२) प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी सुनावणी घेवून सदर अर्धन्यायिक प्रकरणामध्ये तहसीलदार, अंबाजोगाई यांच्या निर्णयास जैसे थे आदेश दिला आहे. त्यामुळे आजपर्यंत सदरील खरेदीखताचे फेरफार मंजूर करण्यात आलेले नाहीत.

परंतू सद्यस्थितीत सदर अर्धन्यायिक प्रकरण उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांच्याकडे वर्ग करण्यात आले असून प्रकरण सुनावणीस्तरावर आहे

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणामध्ये फेरफार मंजूर न झाल्याने शासनाचे महसूली नुकसान झाल्याचे दिसून येत नाही.

(५) होय, दिनांक ०९ जानेवारी, २०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर प्रकरण अर्धन्यायीक स्वरुपाचे असून त्यानुसार कार्यवाही प्रस्तावित आहे.

(६) व (७) सदर अर्धन्यायिक प्रकरण उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांच्याकडे सुनावणी स्तरावर प्रलंबित असून मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका देखिल दाखल आहे. तसेच सदर न्यायालयीन प्रकरणामध्ये दिनांक १६.११.२०२२ रोजी तहसीलदार,अंबाजोगाई यांनी मा.न्यायालयात म्हणणे दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील सर्वे.नं. ३४४/१ मधील श्री. नंदकिशोर सोमवंशी यांनी घेतलेल्या ०२ हेक्टर ०२ आर जमिनीचा नजराणा रक्कम न भरता बनावट प्लॉट विक्री केली जात असल्याबाबत**

**(८) ४३१८८ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील सर्वे.नं. ३४४/१ मधील ०४ हेक्टर ६९ आर जमिनी पैकी श्री. नंदकिशोर सोमवंशी, रा. अंबाजोगाई यांनी ०२ हेक्टर ०२ आर जमीन दिनांक ४ जून,२०१९ रोजी वा त्यासुमारास खरेदी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन ही ईनाम जमीन असून जमिनीची अकृषी परवानगी ही दिनांक ०८ फेब्रुवारी,२०१९ रोजी दिली तसेच सदर अकृषी परवानगी आदेशावर तहसील कार्यालयाचा जावक क्रमांक नाही, तसेच परवानगी देऊन अडीच वर्ष झाले परंतु सदर रक्कम अद्याप शासनास भरलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीचा नजराणा भरण्याबाबत अकृषी परवानगी मध्ये तहसीलदार, अंबाजोगाई यांनी २०२० रुपये प्रती चौरस मीटर या दराने २०२०० चौरस मीटरचे दोन वर्ष प्रती वर्षाप्रमाणे भरण्याबाबत परवानगी पत्रामध्ये लिहले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील अकृषी परवानगी तहसील कार्यालय, अंबाजोगाई यांचेकडून अधिकृतपणे दिलेली नाही. त्याबाबत तहसीलदार, अंबाजोगाई यांनी दिनांक ०९ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास लिहून दिले आहे की सदर अकृषी आदेश तहसील कार्यालय अंबाजोगाई या कार्यालयाकडून निर्गमित केला नाही तसेच सर्वे.नं. ३४४/१ मध्ये बनावट अकृषी आदेशाद्वारे प्लॉट विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना सर्वे.नं. ३४४/१ मधील ०४ हेक्टर ६९ आर जमिनी पैकी श्री.नंदकिशोर सोमवंशी यांनी घेतलेल्या ०२ हेक्टर ०२ आर जमिनीची अकृषी परवानगी बनावट असल्याबाबत व नजराणा रक्कम भरली नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कागदोपत्री तक्रार करूनही कार्यवाही केली नाही हे ही लोकप्रतिनिधी यांना कळवण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अकृषि आदेशावर जावक क्रमांक नसल्याची बाब खरी असून संबंधिताने अकृषी रक्कम रु. १२ लक्ष रुपये शासन खाती ग्रास प्रणालीवर दिनांक ०८.०२.२०१९ रोजी भरणा केला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर जमिनीची अकृषि परवानगी तहसील कार्यालय, अंबाजोगाई यांचेकडून अधिकृतपणे दिलेले नसल्याची बाब तहसीलदार, अंबाजोगाई यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९.०८.२०२१ रोजी तक्रारदारास कळविली होती.

सदर अकृषी परवानगी आदेशावरील "स्वाक्षरी" व "चालन" यांची शहानिशा केली असता तत्कालीन तहसीलदार यांनी सदर आदेश निर्गमित केले असल्याचे दिसून आले. सहायक दुय्यम निबंधक, अंबाजोगाई कार्यालयाच्या दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या अहवालानुसार दिनांक ०६.१२.२०२१ नंतर मौ. अंबाजोगाई येथील जमीन सर्वे ३४४/१ मध्ये नंदकिशोर सोमवंशी यांचे नावे एकही खरेदी विक्री व्यवहार झालेला नाही.

(५) व (६) श्री.संतोष रुईकर, तत्कालीन तहसीलदार, अंबाजोगाई यांनी भोगवटादार-२ च्या जमिनीबाबत नजराणा रक्कम भरणा करुन अकृषी आदेश निर्गमित केले आहेत. यास्तव, तत्कालीन तहसीलदार, अंबाजोगाई यांचा खुलासा घेण्यात आला असता तो समाधानकारक नसल्याचे आढळून आले. सबब, प्रकरणात उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी दिनांक २२.११.२०२२ अन्वये तत्कालीन तहसीलदार, अंबाजोगाई यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील कलम ८ नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर सर्वे क्रमांकाचा प्रकरणांबाबत पूनरिक्षणाचा अहवाल अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिनांक १७.०१.२०२२ रोजी सादर करण्यात आला. त्यानुसार अपर जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांनी उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांना पूनरिक्षणाबाबत नियमाधीन कार्यवाही करण्यासाठी दिनांक २८.०१.२०२२ रोजी कळविले आहे. सदर प्रकरणात पूनरिक्षणात पारीत होणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही अनुसरण्याचे नियोजीत आहे.

---

### चनई (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील गट.क्र. ६५ ही दर्ग्याची जमीन विनापरवाना खाजगी लोकांच्या नावे करून प्लॉट पाडून खरेदी विक्री केल्याबाबत

**(९) ४३१९४ (२९-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चनई (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील गट.क्र.६५ ही जमीन दर्ग्याची इनामी जमीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वे.नं. २३३ व सर्वे.नं. ७१ या जमिनीचाच गट.क्र. ६५ झालेला आहे. सर्वे.नं. २३३ व सर्वे.नं. ७१ ही दर्गा हजरत शेख मसूद किरमाणी मस्जिद व कब्रस्तान नगारखाना व खानखाहची जमीन आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हजरत शेख मसूद किरमाणी मस्जिद व कब्रस्तान नगारखाना व खानखाहची जमीन खाजगी व्यक्तींच्या नावे करून ती विकत घेऊन त्यावर अनिवासी अकृषी करून भूखंड विकले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा वक्फ अधिकारी बीड यांनी दिनांक १८ जुन,२०२१ रोजी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चनई (ता.अंबाजोगाई) येथील हजरत शेख मसूद किरमाणी मस्जिद व कब्रस्तान नगारखाना व खानखाह ची एकूण क्षेत्र २१ एकर ०९ गुंठे ही वक्फ बोर्डाची जमिन बोर्डाने व भुसूधार कार्यालय, बीड यांनीही खालसा केलेली नाही हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, बिगर शेती करताना दुय्यम निबंधक यांनी दिलेल्या किंमतीच्या ७५% नजराणा रक्कम शासनास भरलेली नाही हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर जमिनीत खाजगी लोकांची नावे लावून वक्फचे उद्देश संपुष्टात आणले असून सदर शेतजमीन खरेदी विक्री केल्यामुळे वक्फ बोर्डाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्याच प्रमाणे नजराणा रक्कम न भरल्याने शासनाचेही मोठ्या प्रमाणत नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांच्यासह उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई व तहसीलदार, अंबाजोगाई. यांच्याकडे दिनांक ०४ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारस केली होती हे खरे आहे काय,

(८) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सर्वे नंबर २३३ व सर्वे नंबर ७१ या जमिनीचा गट क्रमांक ६५ झालेला नाही. तसेच, सदर जमीन दर्गा हजरत शेख मसूद किरमाणी मस्जिद व कब्रस्तान नगारखाना व खानखाहची जमीन नाही.

तसेच, सन १९८७-८८ मध्ये सदर गट क्र. ६५ ही जमीन चिराग मोहीयोद्दीन खतीब यांचे नांवे होती. त्यांच्या निधनानंतर गुलाम अहमद पि.चिराग मोहदीयोददीन व इतर ६ या व्यक्तींची नांवे वारस फेर दिनांक १४.०५.२००२ अन्वये मंजूर झाली. सदर फेर आधारे गुलाम अहमद व गुलाम समदानी यांची नांवे मालकी रकान्यात आली व या जमीन धारकांनी सदर जमीन विविध व्यक्तींना विक्री केली.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) सदर खाजगी जमीन असल्याने खालसा करण्याचा व नजराणा रक्कम भरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(७) व (८) होय, स्थानिक लोकप्रतिनिधींनी चौकशी करुन कार्यवाही करण्याची मागणी शासनाकडे व जिल्हाधिकारी, बीड (अधिपत्याखालील) कार्यालयाकडे दिनांक ०४.०८.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे केली होती. शासनस्तरावर प्राप्त पत्राच्या अनुषंगाने दिनांक ०३.०९.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

सह दिवाणी (कनिष्ठ स्तर) न्यायालय, अंबाजोगाई यांचेकडील दिवाणी दावा क्र.८१/७५ मधील आदेशानुसार मौ. चनई येथील गट नंबर ६५ मधील जमीन ही वक्फ मिळकत नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. तसेच, वक्फ कमीशन समोरील तक्रार क्रमांक ६७/२००९ मध्ये वरील दिवाणी दाव्याचा संदर्भ नमूद असून त्यामध्ये कोणतेही अपिल दाखल झालेले नाही. त्यामुळे दिवाणी न्यायालयाचा मौ .चनई येथील गट नंबर ६५ मधील जमिन ही वक्फ मिळकत नसल्याचा निर्णय कायम असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तुत प्रकरणात अपर जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०५.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे अध्यक्षतेखाली तहसिलदार, अंबाजोगाई व नायब तहसीलदार अंबाजोगाई यांची चौकशी समिती नियुक्त केली होती. सदर समितीच्या अहवालावरुन सदर वादग्रस्त जमीन ही इनामी /वक्फ मालमत्ता नसल्याची बाब दिसून येत असून या अहवालाची प्रत स्थानिक लोकप्रतिनिधी यांना देखिल देण्यात आली आहे.

---

## चनई (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील गट.नं. ६५ या ईनामी जमिनीची नजराणा रक्कम न भरता विक्री व अभिन्यास नसतानाही अकृषी परवानगी घेऊन प्लॉट विक्री केल्याबाबत

**(१०) ४३१९५ (२९-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६६५ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चनई, (ता.अंबाजोगाई, जि. बीड) येथील गट.नं. ६५ पूर्वीचे सर्व्हे.नं. २३३ व ७१ ही जमीन ईनाम जमीन आहे तसेच सदरील जमीन विक्री बाबत भूसुधार कार्यालय, बीड यांची परवानगी घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट.नं. ६५ च्या दोन भागात अकृषी (एन.ए) ला परवानगी घेतली आहे. त्यापैकी एका भागाचा बिगरशेती अभिन्यास केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात ह्या जमिनीत आधीच लोकांची घरे होती व ग्रामपंचायत कार्यालयाला नावे व पि.टी.आर असतांना ही व ग्रामपंचायत पि.टी.आर. वर खरेदी/विक्री झालेली असतानाही सदर जमिनीची मोजणी व अभिन्यास करून अकृषी (एन.ए) परवानगी घेतली आहे. प्रत्यकक्षात अभिन्यासाप्रमाणे प्लॉटस जागेवर नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास ,शासन नियमाप्रमाणे सदरील जमिनीचा नजराणा दुय्यम निबंधक यांनी काढून दिलेल्या किमांतीच्या ७५% रक्कम शासनास भरणे आवश्यक असतानाही संबंधितानी नजराणा रक्कम भरली नाही व तहसील प्रशासनानेही भरून घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी प्रत्यक्षात मंजूर अभिन्यासाप्रमाणे रेखांकन झालेले नाही त्यामुळे सदर जागेवरील प्रत्यक्ष अनधिकृत विकासाबाबत उपअधीक्षक, भूमीअभिलेख विभागाची प्रत्यक्ष जागेवरील सद्य:स्थिती दर्शविणारा मोजणी नकाशा प्राप्त होण्याबाबत व सद्य:स्थिती मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये नियोजन प्राधिकरण म्हणून प्रकरणी जागेवरील अनधिकृत विकासाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून पडताळणी होऊन जागेवरील नियमबाह्य विकासाबाबत कार्यवाही करणे आवश्यक असल्याबाबत सहायक संचालक, नगररचना बीड यांनी दिनांक ०७ जुलै,२०२१ रोजीच्या पत्रान्वये उप जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणात नजराणा रक्कम त्वरित भरून घेण्याबाबत व ईनाम जमीन विक्री प्रकरणाची चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री व उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक ५ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) उपलब्ध कागदपत्रांवरुन चनई (ता.अबांजोगाई, जि.बीड) येथील गट.नं ६५ पूर्वीचे सर्व्हे.नं.२३३ व ७१ ही जमीन खाजगी स्वरुपाची असल्याची दिसून येत आहे. त्यामुळे सदर जमीनीच्या फेरफार अभिलेखावरुन जमीन विक्री बाबत भुसूधार कार्यालयाची परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अकृषिक आदेश दिनांक ०९.०९.२००५ मध्ये अभिन्यासासाठी मोजणी करतांना आधीच लोकांची घरे बांधली होती. परंतू, मोजणी अधिकारी यांनी मोजणी नकाशात घरे दाखविली नाहीत. अकृषीक आदेश दिनांक ०९.०९.२००५ रोजीचा असून त्यास जवळपास १६ वर्ष झाली आहेत या कालावधीत सदर भागात अनेक ठिकाणी बांधकामे झालेली असून सन २००५ मध्ये सदर ठिकाणी किती घरे बांधलेली होती याबाबत स्थळपाहणीमध्ये चौकशी करता आली नाही. तसेच मोजणी नकाशा तयार करतेवेळी त्या ठिकाणी अस्तित्वात असलेली बांधकामे नकाशामध्ये दर्शविली गेलेली नाहीत तसेच सदर जागेवर प्लॉटिंग होवून प्लॉटधारक यांची नांवे पीटीआर ला नोंद झालेली असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(४) सदर जमीन खाजगी आहे. यास्तव, नजराना रक्कम भरणा करण्याचा प्रश्न उद्धवत नाही.

(५) हे खरे आहे. दिनांक ०७ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, अंबाजोगाई यांच्या स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(६) अशा आशयाचे मा.मंत्री (महसल) यांना अग्रेषित केलेले निवेदन दिनांक ११.१०.२०२२ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना पाठविण्यात आले असून सदर तक्रारीवर क्षेत्रीय स्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(७) अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांचे आदेश दिनांक ०५.०८.२०२१ अन्वये उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांचे अध्यक्षतेखाली तहसीलदार अंबाजोगाई व नायब तहसीलदार अंबाजोगाई यांची चौकशी समिती गठीत केली असून तहसीलदार अंबाजोगाई व उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचा संयुक्त अहवाल व उपलब्ध अभिलेखावरुन वादग्रस्त जमीन ही इनामी / वक्फ मालमत्ता नसल्याची बाब प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रकरणात मा.सह दिवाणी (क स्तर) अंबाजोगाई यांनी मौ.चनई येथील ग.नं.६५ मधील जमीन ही वक्फ मिळकत नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. तसेच प्रकरणात वक्फ कमीशन समोरील तक्रार क्र.६७/२००९ मध्ये वरील दाव्याचा संदर्भ नमूद करण्यात आला आहे व सदर दिवाणी न्यायालय इनामचे स्वरूप निश्चित करण्यास सक्षम असल्याने व सदर इनाम दर्गाह सेवा इनाम नसल्याच्या दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयास आव्हान दिले गेलेले नसल्याने या निर्णयामध्ये हस्तक्षेप केला जावू शकत नसल्याची बाब नमूद केली आहे.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील सर्व्हे.नं. ४३६/२ या देवस्थानाच्या जमिनीची नजराणा रक्कम भरून घेण्याबाबत

**(११) ४३२११ (२९-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) येथील सर्व्हे.नं. ४३६/२ ही जमीन देवस्थानाची ईनाम जमीन आहे, तसेच सदर जमीन खिदमतमास जमीन असतानाही मदतमास दाखवून भुसुधार कार्यालय, बीड यांनी जमिनीवरील कुळाच्या नावे जमीन केली त्यांनी ही जमीन विकली व विकत घेणाऱ्यांनी बिगरशेती करताना जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीच्या अकृषी परवानगी आदेशा मध्ये पूर्ण आदेश टंकलिखित केलेला आहे, परंतु आदेशाच्या मध्येच दोन ओळी नजराणा रक्कम भरली म्हणून हस्ताक्षराने लिहिले आहे. त्यात रक्कम व पावती नंबर नाही तसेच सदरील जमीन भोगवटा-०२ च्या असतांना जिल्हाधिकारी यांची परवानगी न घेता भोगवटा-०१ केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीची आत्तापर्यंत शासनाला नजराणा रक्कम दुय्यम निबंधक यांनी काढून दिलेल्या किमंतीच्या ७५% भरलेला नाही, तसेच सदर जमिनीची नजराणा रक्कम त्वरित भरून घेऊन शासनाचे नुकसान टाळावे व जमीन खालसा प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उप जिल्हाधिकारी, अंबाजोगाई व तहसीलदार अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक ०५ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास व त्यापूर्वी निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांचे दिनांक ०२.०५.१९९८ व दिनांक ०६.११.१९९९ या आदेशानुसार स.नं.४३६/२ या देवस्थान ईनाम जमिनीची प्रतिबंधित मालकी घोषित केली. तसेच, तहसीलदार, अंबाजोगाई यांच्या आदेशानुसार सदर जमीन बिगरशेती झाल्याचे दिसून येते.

(२) हे खरे आहे.

अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या दिनांक २८.०१.२०२२ रोजीच्या पत्रानुसार भोगवटादार वर्ग २ च्या ज्या जमिनी विनाआदेश भोगवटादार वर्ग १ झालेल्या आहेत त्यांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, अंबाजोगाई यांचे स्तरावर सुरु आहे.

(३) होय, असे निवेदन दिनांक ०७.०९.२०२१ रोजी तहसीलदार, अंबाजोगाई यांना प्राप्त झाले आहे.

(४) व (५) अंबाजोगाई, (जि. बीड) येथील सर्व्हे.नं. ४३६/२ मधील दि.०६.०२.२००३ रोजीचे अकृषिक आदेश खरेदीदाराने त्यांचे खुलाशासोबत सादर केलेले आहेत. त्यावरुन बाजारमूल्याच्या ५०% नजराणा रक्कमेचा भरणा केल्याची हस्तलिखित नोंद असून उर्वरित रक्कमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर कार्यवाही नियोजीत आहे.

---

## सिरसाळा व परळी (ता. परळी, जि. बीड) येथे श्री. युवराज सोळंके हे तलाठी म्हणून कार्यरत असताना त्यांनी ईनाम जमिनी भोगवटा-२ च्या भोगवटा-१ केल्याबाबत

**(१२) ४३३३८ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसाळा व परळी (ता.परळी, जि.बीड) येथे श्री. युवराज सोळंके हे तलाठी म्हणून कार्यरत असताना त्यांनी देवस्थान/ईनाम जमिनी जिल्हाधिकारी, बीड यांची परवानगी न घेता भोगवटा-२ च्या भोगवटा-१ केल्याबाबत तक्रारी आहेत, त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे

दिनांक २१ जानेवारी,२०२२ रोजी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१), (२) व (३) श्री.युवराज सोळंके, तलाठी यांचेबाबतीत प्रश्नाधीन आशयाची लोकप्रतिनिधींची तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी प्राप्त झाली होती.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयाने चौकशी केली असता, पुढील बाब निदर्शनास आली आहे :- मौ.सिरसाळा, ता.परळी, येथील जमिनीच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता तेथे इनाम जमिनी नाहीत. त्यावरुन आज गा.न.नं.७/१२ च्या धारणाधिकार सदरी खाजगी लोकांची नावे आहेत. सन २०१६ मध्ये श्री.रमेश मस्के हे तलाठी, सिरसाळा या पदावर कार्यरत असताना जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १०.०७.२०१५ रोजीच्या पत्रात नमूद वक्फ जमिनीवरील इतर लोकांची नांवे कमी करण्याबाबत अभिप्राय मागविले होते. त्यानुसार, श्री.मस्के, तत्कालीन तलाठी, सिरसाळा यांनी अभिप्राय देण्याऐवजी चूकीने फेर क्र.३४७५ घेतला व या फेरफार आधारे विविध गट क्रमांकाच्या वर्ग-१ च्या जमिनी वर्ग-२ मध्ये रुपांतरीत झाल्या. श्री.रमेश मस्के तत्कालीन तलाठी यांचे दिनांक ३१.०१.२०१६ रोजी निधन झाले असल्याने उक्त चुकीकरीता त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई अनुसरण्यात आली नाही.

तथापि, सदर प्रकरणीचा फेर क्र.३४७५ च्या नाराजीने संबंधित शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, परळी यांचेकडे अपिल दाखल केले. प्रस्तुत प्रकरणी दाखल अपिल अर्जावर उपविभागीय अधिकारी, परळी यांनी दिनांक ०९.०३.२०२१ रोजी आदेश पारीत केले व या आदेशाआधारे श्री.युवराज सोळंके, तलाठी, सिरसाळा यांनी फेर क्र.३४७५ रद्द केला आहे व त्यामुळे या जमिनी पूर्वीप्रमाणे वर्ग-१ झालेल्या असून पूर्वीप्रमाणे खाजगी लोकांची नांवे अधिकार अभिलेखात लावण्यात आली आहेत.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील सर्वे नं. ३५८/३५९ या जमिनीबाबत चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत

**(१३) ४३५२३ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील सर्वे नं. ३५८/३५९ ही देवस्थानाची ईनाम जमीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाजोगाई (जि. बीड) येथील सर्वे नं. ३५८/३५९ या जमिनीचा अभिन्यास करताना ओपन स्पेस न ठेवणे, आरक्षण क्र.७८ आरक्षित असतांना त्यातील प्लॉट विकणे, नदीला नाला दाखवणे, नदीला नगरपरिषदेने परवानगी दिली नसताना संरक्षक भिंत बांधणे, हरित पट्टा न सोडणे, त्याच सर्वे नं. मधील शासनाची सरकारी लोकल फंडची जागा अतिक्रमण करून स्वता:च्या अभिन्यासात दाखवणे, आरक्षण क्र. ७८ स्थलांतरण त्याच सर्वे नंबर मध्ये करण्याऐवजी दुसऱ्या सर्वे नंबर मध्ये करून नियमबाह्य व बेकायदेशीर पणे अभिन्यास केल्याबाबत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानीक लोकप्रतिनिधी यांनी कागदोपत्री पुराव्यासह राज्याचे महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १९ मार्च,२०२०, १९ जुन, २०२० व २४ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास सदर सर्वे नं. ३५८/३५९ मधील गैरप्रकार झालेल्या विविध २० मुद्यावर चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२२) :** (१) सदर स.नं.३५८ व ३५९ या दोन्ही इनाम जमिनीची नोंद गांव नमूना ३ मध्ये नाही. परिणामी सदर जमीन देवस्थान इनाम जमीन नाही.

स.नं.३५८ बाबत नोंदविलेला फेरफार क्र ४६१६ चे अवलोकन केले असता त्यामध्ये उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे कार्यालयाचे सक्शेशन सर्टिफिकेटच्या आधारे विरासत मंजूर करण्यात आल्याने सदर जमीन इनामी जमीन असल्याचे दिसून येते. त्यानुसार नोंदवही अद्ययावत करण्याची कार्यवाही तहसील कार्यालय स्तरावर करण्यात येत आहे.

मात्र, स.नं.३५९ ही जमीन इनाम जमीन नसून खाजगी जमीन आहे.

(२), (३) व (४) विषयाधीन जमिनीबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १६.०९.२०२० च्या आदेशान्वये सदरील स.नं.३५८ व ३५९ मधील रेखांकने रद्द करण्यात आल्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठासमोर दाखल रिट याचिका क्र.९८२/२०२१ मध्ये आव्हानित झाल्यानंतर मा.न्यायालयाने दिनांक २३.०६.२०२१ रोजी जिल्हाधिकारी बीड यांनी पून्हा सर्वे नं.३५८ व ३५९ मधील ले-आऊट बाबतच्या प्रकरणांत सुनावणी घेवून ६ महिन्यात निकाल देण्याबाबत आदेशित केले होते.

त्यानुसार, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०२.०९.२०२२ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार स.नं.३५८/३५९ मधील रेखांकनामध्ये अनियमितता झालेली असून मुख्याधिकारी, नगर परिषद अंबाजोगाई यांना सदर अनियमिततेबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून अनियमित रेखांकनाबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची नांवे निश्चित करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

याशिवाय तत्कालीन नगर रचनाकार बीड यांच्याविरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव संचालक, नगर रचना विभाग यांना पाठविण्याचे आदेश देण्यात आले तसेच भूमी अभिलेख बीड कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील भूविकास बँकेमधील शेतकऱ्यांच्या थकीत रक्कमेची कर्जमाफी करणे व कर्मचाऱ्यांची देणे देण्याबाबत

**(१४) ४३६६२ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूविकास बँकेमधील शेतकऱ्यांच्या थकीत रक्कमेची कर्जमाफी करणे व कर्मचाऱ्यांची देणे देण्याकरीता दिनांक १८ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये भूविकास बँकामधील सर्वच थकबाकीच्या रक्कमेची कर्जमाफी करण्याची घोषणा करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सहकार विभागाकडून प्रस्ताव वित्त विभागाकडे दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत भूविकास बँकेची थकीत रक्कम कर्जमाफी करणे, कर्मचाऱ्यांची देणी देण्याकरीता वेळेत कार्यवाही करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०२२ वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कर्जमाफीची मागणी त्वरीत करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१५-०६-२०२२) :**(१), (२) व (३) होय.

(४) मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) यांचे अध्यक्षतेखाली भुविकास बँक कर्मचाऱ्यांच्या थकीत देणीबाबत दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये भुविकास बँकेच्या कर्जदार शेतकऱ्यांची कर्जे माफ करणे तसेच भुविकास बँकांच्या कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करुन त्यापोटी भुविकास बँकांच्या

सर्व मालमत्ता शासनाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मंत्रीमंडळ प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला असून त्यानुषंगाने वित्त विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरोनाने मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१५) ४३८२५ (०७-०४-२०२२). अ‍ॅड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या अपघातकालीन मदतीसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करण्यात आली असून, ७/१२ धारक शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना याचा लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमध्ये कोरोनामुळे मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करून त्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाच्या वतीने दिनांक ४ जून २०२१ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१६-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत कोरोनामुळे मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करून त्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबतची मा. श्री. राजेंद्र राऊत, विधानसभा सदस्य व मा. श्री. प्रविण पोटे पाटील, विधानपरिषद सदस्य यांची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) उपरोक्त निवेदनांच्या अनुषंगाने मा. सदस्यांना प्रकरणाची वस्तुस्थिती दिनांक २१.०६.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील संत्रा उत्पादकांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(१६) ४६६५६ (०१-११-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापुर (जि.अमरावती) येथील पयशादेव शिवारातील श्री.अरुण पटोकार या संत्रा उत्पादकाला उत्पादन खर्च मिळाला नसल्याने त्याने त्यांच्या ९ एकरातील संत्रा बागेतील ८०० झाडे तोडून टाकली असल्याचे दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त संत्रा उत्पादक फळांवर येणाऱ्या अज्ञात रोगाने व वांरवार उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीने निराश झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

(३) राष्ट्रीय लिंबूवर्गीय संशोधन केंद्र, नागपुर येथील शास्त्रज्ञांनी अमरावती जिल्हयातील संत्रा बागांची पाहणी करुन संत्रा फळगळीच्या अनुषंगाने तयार केलेली ॲडव्हायझरी प्रसिध्द केली. तसेच ती कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्यात आली आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे विद्यमाने कृषि संशोधन केंद्र, अचलपुर येथे संत्रा विषयक कार्यशाळा घेण्यात आली. संत्राफळगळ बाधीत क्षेत्राचा अहवाल मा.जिल्हाधिकारी,अमरावती यांचे मार्फत उपसचिव,मदत व पुनर्वसन विभागास सादर केला होता. तद्नंतर विदर्भातील संत्रा फळगळीवर उपाययोजना सुचविण्यासाठी मा.कुलगुरु,पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, राष्ट्रीय लिंबूवर्गीय संशोधन केंद्र, नागपूर येथील शास्त्रज्ञ तसेच कृषि विभागातील अधिकारी यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. सन २०२१-२२ मध्ये फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन योजना (हॉर्टसॅप), ॲडव्हायझरी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच शेतीशाळेचे आयोजन करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

दिनांक ०४/०२/२०२२ पासून अमरावती जिल्हयात संत्राबहुल १०तालुक्यातील प्रत्येकी ५ गावात दर महिन्याला एक शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शेतीशाळेत प्रत्येक महिन्यात संत्रा पिकावरील कीड रोग व्यवस्थापनावर करावयाची कामे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसद (जि.यवतमाळ) येथील मत्स्य विकास महामंडाच्या वतीने अप्पर पैनगंगा इसापूर धरणातील मासेमारीबाबत

**(१७) ४६८१७ (२७-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील मत्स्य विकास महामंडळाच्यावतीने अप्पर पैनगंगा इसापूर धरणातील मासेमारी करण्यासंदर्भातील ठेका कोणतीही निविदा न काढता पुढील १५ वर्षाकरिता देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२२) :** (१) महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळास हस्तांतरित करण्यात आलेल्या पुसद (जि. यतवमाळ) येथील अप्पर पैनगंगा इसापूर धरण या जलाशयाचा मासेमारी हक्क ठेका कालावधी दिनांक २२ सप्टेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर शासन निर्णय लागू झाल्यापासून पुढील १५ वर्षांच्या कालावधीकरीता महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळास वाढवून देण्यात आलेला आहे.

संबधित जलाशयाचे ठेकेदार यांनी एकात्मिक पद्धतीने मत्स्यसंवर्धन करणे ही योजना राबविण्याकरिता जलाशयाच्या ठेक्यास मुदतवाढ देण्यासंदर्भात महामंडळास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महामंडळाने सदर जलाशयाच्या मासेमारी ठेक्यास दिनांक ०१/०७/२०२१ ते दिनांक ३०.०६.२०३६ या कालावधीकरिता मुदतवाढ दिलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील देवस्थान, इनाम व वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीचे अधिकार अभिलेखांच्या माहिती संकलित व पडताळणीबाबत

**(१८) ४८०८८ (३०-१०-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यातील देवस्थान, इनाम व वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीच्या अधिकार अभिलेखांच्या माहिती संकलित व पडताळीत करण्याच्या सुचना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच देवस्थान इनाम जमिनी संदर्भात बीड जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी (भुसूधार) बीड यांनी पारीत केलेल्या निर्णयाचे पुनरीक्षण करणेस परवानगी मिळण्याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १० मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये अप्पर मुख्य सचिव (महसुल) यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल विभागीय आयुक्त यांना प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, प्राप्त झालेल्या अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) (४) व (५) औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून इनाम / वक्फ जमिनी बाबतची माहिती विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाली आहे.

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालयाकडून सद्यस्थितीत सदर माहितीची छाननी प्रक्रिया सुरु असून त्यामध्ये आढळून येणाऱ्या त्रुटींच्या अनुषंगाने पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील इनाम जमिनी/देवस्थानच्या चुकीच्या पद्धतीने खालसा केलेल्या जमिनीची एस.आय.टी. (S.I.T) मार्फत चौकशी करण्याबाबत

**(१९) ४८४३४ (२२-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज)** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (ता. अंबाजोगाई, जि.बीड) येथील इनाम जमिनी खिदमतमास असतांना महसूल यंत्रणेमार्फत मदतमास दाखवून चुकीची कागदपत्रे दाखल करून अंबाजोगाई येथील सर्वे.नं. ४३६/२ व ३४४/१ तसेच चनई, ता. अंबाजोगाई. येथील गट.नं. ६५ (जुना ३३३ व ७१) या जमिनी चुकीच्या पद्धतीने खालसा केल्या आहेत. त्याच प्रमाणे अंबाजोगाई येथील देवस्थान जमिनी सर्वे.नं. ३३५/१, ३३५/२, ३२० व ३२२ या चुकीच्या पद्धतीने खालसा केल्या आहेत. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीचा शासनाच्या नियमाप्रमाणे नजराणा भरलेला नाही, प्रस्तावित अभिन्यासावरच तहसील कार्यालय, अंबाजोगाई यांनी नजराणा रक्कम भरून न घेता अकृषी (एन.ए) परवानग्या दिलेल्या आहेत. तसेच सदर प्रश्नी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रारी करूनही उप जिल्हाधिकारी, अंबाजोगाई व तहसीलदार, अंबाजोगाई यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यात देवस्थान/इनाम जमिनीची एस.आय.टी. (S.I.T) मार्फत चौकशी सुरु आहे, त्यात अंबाजोगाई येथील वरील सर्वे नंबरचाही एस.आय.टी. (S.I.T) मार्फत चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उपजिल्हाधिकारी व तहसीलदार, अंबाजोगाई यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

सर्वे क्र.३३५/१ व ३३५/२ मधील इनाम जमिनीबाबत मा.दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर व संयुक्त धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडील आदेशान्वये व तद्नंतर खरेदी खताच्या आधारे फेरफार नोदविले असल्याचे दिसून येते. तथापि, सर्वे क्र.३२० व ३२२ मधील इनाम जमिनीबाबत उपजिल्हाधिकारी, सामान्य, भूसुधार, बीड यांनी प्रतिबंधित मालकी घोषित करण्याबाबत पारीत केलेले दिनांक २७.०२.२०१८ रोजीचे आदेश अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी पूनर्विलोकनात दिनांक १०.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये रद्द केले आहेत.

अंबाजोगाई, जि.बीड येथील सर्वे नं.४३६/२ या इनाम जमिनीबाबत उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी दिनांक ०६.११.१९९९ च्या आदेशान्वये उक्त जमिनीची प्रतिबंधित मालकी (मदतमाश) घोषित केली आहे. तसेच, सर्वे क्र.३४४/१ मधील इनाम जमिनीबाबत उपआयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक ०४.०२.१९९५ च्या आदेशान्वये उक्त जमिनीची प्रतिबंधित मालकी (मदतमाश) घोषित केली आहे. तथापि, इनाम जमिनीची नोंदवही (गाव नमुन क्र.३) मध्ये गट नं.६५ ची नोंद आढळून येत नाही.
(२), (३), (४) व (५) अंबाजोगाई, जि.बीड येथील विषयाधीन सर्वे नं.पैकी सर्वे नं.४३६/२ या जमिनीबाबत प्राप्त करुन घेण्यात आलेल्या दिनांक ०६.०२.२००३ च्या अकृषीक आदेशानुसार बाजारमूल्याच्या ५०% नजराणा रक्कम भरणा केल्याचे दिसून येते.

याबाबत बीड जिल्हयातील वक्फ/देवस्थान इनाम जमिनीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासन निर्देशानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनाकडे सुपूर्द केला.

सदर चौकशी अहवालानुसार बीड जिल्ह्यातील इनाम जमिनी व वक्फ जमिनीबाबत प्राप्त अपिल प्रकरणात तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भूसुधार) बीड यांनी ९३ प्रकरणांत आदेश पारीत केले असून त्यापैकी ४० प्रकरणे ही पूनरिक्षणास योग्य असल्याचे दिसून आले आहे. हैद्राबाद इनामे आणि रोख अनुदाने नष्ट करणे अधिनियम १९५४ कलम २ (अ) मधील तरतूदीनुसार शासनास एक वर्ष मुदतीपर्यतच्या अपिल प्रकरणांमध्ये कागदपत्रे मागवून कार्यवाही करण्याचा अधिकार असून सदर ४० प्रकरणे पूनर्विलोकनामध्ये घेण्यासाठी एक वर्षाची मुदत संपुष्टात आली असल्याने उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील गावांची जमिन नोंदी ऑनलाईन करण्याबाबत

**(२०) ४९७२२ (१७-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ५०० हून अधिक गावामध्ये जमिनीचे उतारे ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची योजना आखून तिची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण किती गावाचे उतारे ऑनलाइन करण्याचे प्रस्तावित आहे तसेच दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास या योजनेच्या कार्यवाहीची सध्यस्थिती काय,
(३) उक्त योजनेचे नियोजित उद्दिष्ट पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामकाज सुरु होण्यासाठी किती कालावधी लागेल, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
राज्यातील सर्व महसूली गावांमध्ये अधिकार अभिलेख ऑनलाईन करण्यात आले आहेत. राज्यातील सुमारे

२,६२,००,००० सात-बारा संगणकीकृत करण्यात आले आहेत. माहे जानेवारी, २०२३ अखेर राज्यात ई-फेरफार प्रणालीव्दारे एकूण २,१९,८५,३७६ फेरफार नोंदी घेण्यात आल्या आहेत. राज्यात जानेवारी, २०२३ अखेर ४९.५७ कोटी ७/१२, १४.४१ कोटी एवढे ८-अ व १.३७ कोटी फेरफार इतके संगणकीकृत अधिकार अभिलेख डाऊनलोड करण्यात आले आहेत.

(३) सात-बारा संगणकीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव काळी दौलतखान (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रातील जंगलात**
**वृक्ष लावण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याबाबत**

**(२१) ५१५८४ (२३-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव काळी दौलतखान (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रातील जंगलालगत असलेल्या मालकी पट्ट्याची भूमी अभिलेख कार्यालयामार्फत नकाशा मोजणी करुन न घेणे, परवानगी एकाची व शेजारच्या शेतातील सागवान वृक्ष विनापरवाना तोड करुन मालकी पट्ट्यात मिसळ करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेजारच्या शेतकऱ्यांना विश्वासात न घेता, वृक्ष कटाईला परवागनी देणे, जेवढे वृक्ष तोडले तेवढेच लावणे गरजेचे असताना त्याकडे जाणीवपूर्वक भूमी अभिलेख कार्यालय दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही,

महागांव काळी दौलतखान (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्राच्या जंगलालगत असलेल्या मालकी प्रकरणात विभागीय कार्यालयातील वनसर्वेक्षक यांच्याकडुन वनाची हद्द निश्चित करुन हद्दीतील झाडे प्रतिबंधीत करण्यात येते. संबंधित वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, क्षेत्र सहायक व वनरक्षक यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन मौका पंचनामा नोंदविल्यानंतर संबंधित वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल यांच्याकडुन महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार व वेळोवेळी झालेल्या सुधारणानुसार वृक्षतोड झाल्यानंतर पुन्हा तपासणी करुन रितसर कार्यवाही करण्यात येते.

मालकी वृक्ष तोड प्रकरणात होत असलेली कार्यवाही काटेकोरपणे होत असल्याने परवानगी एकाची व शेजारच्या शेतातील सागवान वृक्ष विनापरवाना तोड करुन मालकी पट्यात मिसळ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) वृक्षतोड अधिनियम १९६४ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड प्रकरणी वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कडुन कार्यवाही करण्यात येते. शेजारच्या शेतकऱ्यांचे नाहरकत प्रमाणपत्रावर स्वाक्षरी घेवुन तसेच कायदा व नियमातील तरतुदीप्रमाणे जेवढे वृक्ष तोडले तेवढे वृक्ष लावण्याबाबत संबंधित शेतकऱ्यांकडून हमीपत्र घेण्यात आल्यानंतर वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडुन वृक्षतोड परवानगी देण्यात येते.

त्यामुळे याकडे जाणीपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याबाबत माहे ऑक्टोबर,२०२२ व त्यादरम्यान निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भाटुंबा (ता. केज, जि. बीड.) येथील ग्रामपंचायतचे प्रभाग विभाजन चुकीच्या पद्धतीने केल्याबाबत**

**(२२) ५२१२३ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाटुंबा (ता. केज, जि. बीड) येथील ग्रामपंचायतचे प्रभाग विभाजन मा. निवडणूक आयोगाच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास अनुसुचि नमुना (अ) प्रमाणे प्रसिध्द केले नाही, तसेच येथील प्रभाग क्र. १, २ व ३ ची व्याप्ती/ विस्तार हा अनुसुचि नमुना "अ" प्रमाणे केलेला नसून, प्रभाग १ मध्ये एकूण ९५, प्रभाग २ मध्ये ११८, प्रभाग ३, मध्ये ३७, मतदार चुकीच्या पद्धतीने समाविष्ट करण्यात आलेले आहेत, तर एकूण चार मतदारांचा दोनदा मतदार यादीत समावेश असल्याचा आक्षेप श्री, सुनील शिवकीरन धपाटे यांनी तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी, केज यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर , २०२२ रोजी आक्षेप अर्ज दाखल केला, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आक्षेपावरून संबंधित कर्मचारी यांनी चुकीच्या पद्धतीने प्रभाग विभाजन केलेले असल्याचे दिसुन येते. गावाचा अनुसुची नमुना 'अ' व अनुसुची नमुना 'ब' संबंधीत कर्मचारी यांनी चौकशी न करता प्रभाग विभाजन केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे प्रभाग विभाजनाची कार्यवाही मा. निवडणुक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे करणे अत्यंत आवश्यक असून करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अहवाल सादर करण्याबाबत उप जिल्हाधिकारी, (सामान्य) बीड यांनी तहसीलदार, केज. यांना आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणात तहसीलदार, केज. यांनी प्रभाग विभाजन चुकीच्या पद्धतीने केल्याच्या तक्रारीच्या आधारेदिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास चौकशी समिती नेमली होती, सदर चौकशी समितीने गावात जाऊन चौकशी केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास ,उक्त समितीने कुठलीही चौकशी केली नसताना तहसीलदार यांनी दिनांक २ नोव्हेबर, २०२२ वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांच्याकडे मार्गदर्शन मागवून प्रकरणात वेळकाढूपणा करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

६)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०७-२०२३) :**(१) मौजे भाटुंबा (ता.केज, जि.बीड) येथील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभाग विभाजन चुकीच्या पध्दतीने केल्याचा आक्षेप श्री.सुनील शिवकीरन धपाटे यांनी दिनांक १८.१०.२०२२ रोजी तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी, केज, यांच्याकडे नोंदविला होता. सदर आक्षेपाच्या गठित करण्यात आलेल्या २ मंडळ अधिकारी व स्थानिक तलाठी यांच्या चौकशी समितीने उक्त आक्षेप अमान्य केल्याचे दिसून येते.

(२) (३) (४) (५) व (६) श्री.सुनील शिवकीरन धपाटे यांच्या उक्त आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५.१०.२०२२ रोजी जिल्हाधिकारी बीड यांना दिले होते. त्यानुषंगाने तहसिलदार केज, जि.बीड यांनी दिनांक ३१.१०.२०२२ आदेशान्वये ९ सदस्यीय चौकशी समिती गठित करुन दिनांक ०२.११.२०२२ पर्यंत अहवाल सादर करण्याच्या सूचना सदर समितीस देण्यात आल्या होत्या.तथापि मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०४.१०.२०२२ रोजी दिलेल्या निर्देशान्वये प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी दिनांक २१.१०.२०२२ रोजी प्रसिध्द केल्यामुळे त्यांनतर आलेल्या आक्षेपावर कोणतीही कार्यवाही करता येत नसल्याने प्रकरण अंतीम करण्यात आले असा अहवाल जिल्हाधिकारी बीड यांनी दिला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही

---

## महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना सन २०१९ अंतर्गत शासनाने प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या नियमावलीमध्ये सुधारणेच्या मागणीबाबत

**(२३) ५६४९८ (१३-०६-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना सन २०१९ अंतर्गत शासनाने शेतकरी कर्ज माफीकरीता प्रोत्साहन पर लाभ योजनेच्या नियमावलीमध्ये सुधारणा करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लाभ देण्यासाठी सन २०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० हा कालावधी विचारात घेता, दिनांक १ एप्रिल, २०१७ पूर्वी कर्जवाटप व सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये कर्जवाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ज्या शेतकऱ्यांना दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास कर्ज वाटप झाले अशा शेतकऱ्यांना सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये कर्जवाटप दिसत नाही, परंतु बँक धोरणाप्रमाणे कर्जवाटप व वसूल हा निकष लावल्याबाबत तसेच सहकार आयुक्त व निबंधक सह संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय त्वरित सादर करण्याबाबत दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास निर्गमित करण्यात आल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०९-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या दिनांक २९.०७.२०२२ रोजीच्या शासननिर्णयात तसेच योजनेच्या अंमलबजावणीच्या आदर्श कार्यपद्धतीमध्ये सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक ०१.०४.२०१७ पूर्वी झालेल्या पीककर्ज वाटपाचा समावेश सन २०१७-१८ मधील पीककर्ज वाटपात करता येत नाही. तसेच दिनांक ३१.०३.२०२० नंतर झालेल्या पीककर्ज वाटपाचा समावेश सन २०१९-२० च्या पीककर्ज वाटपामध्ये करता येणे शक्य नाही. यास्तव सदर प्राप्त निवेदनानुसार कार्यवाही करणे योग्य ठरणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विकास सेवा संस्थांमध्ये गट सचिवांच्या सेवा व वेतनाचा प्रश्न मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(२४) ५६५०० (१३-०६-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विकास सेवा संस्थामध्ये कार्यरत असणाऱ्या गट सचिवांच्या सेवा व वेतनाचा प्रश्न मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट सचिवांच्या विविध मागण्यांबाबत सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०८-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) गट सचिवांच्या सेवा व वेतनविषयक उपाय योजना सुचविण्यासाठी व त्या अनुषंगाने आवश्यक असल्यास सहकार

कायद्यामध्ये दुरूस्ती करण्याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी सहकार आयुक्त यांनी दि. २८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये डॉ. संजयकुमार भोसले, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. समितीने दि. २४/०४/२०२३ रोजी सहकार आयुक्त कार्यालयास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाची सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर छाननी चालू आहे.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची अनिष्ठ तफावत कमी करण्याच्या दृष्टीने एकरकमी कर्ज परतफेड योजनेच्या (OTS) प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंदरी (ता.केज, जि.बीड) येथील सेवा सहकारी संस्थेच्या चाचणी लेखापरीक्षणाबाबत**

**(२५) ५८२०७ (२२-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंदरी (ता.केज, जि.बीड) येथील सेवा सहकारी सोसायटी संस्थेमधील अनियमितता व गैरव्यवहाराप्रकरणी सहायक निबंधक, केज यांनी सेवा सहकारी संस्था म.उंदरी या संस्थेचा सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या कालावधीच्या लेखापरीक्षण अहवालामधील विभाग "अ" मधील (०६) समान मुद्दे व तक्रारी अर्जाचा चौकशी अहवाल दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ व २०२१-२०२२ च्या लेखापरीक्षण अहवालातील एकूण १० मुद्यांचे चाचणी लेखापरीक्षण करण्याची शिफारस जिल्हा उपनिबंधक, बीड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शिफारस केलेल्या मुद्देनिहाय चाचणी लेखापरीक्षण त्वरित करुन संबंधित दोषीवर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हा उपनिबंधक, बीड यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-०७-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) होय.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म., उंदरी ता. केज, जि. बीड या संस्थेचे सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीतील लेखापरीक्षण अहवालातील नमूद ०१ ते ०६ मुद्दे व तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेला चौकशी अहवाल तसेच सन २०२१-२०२२ च्या लेखापरीक्षण अहवालातील १ ते १० मुद्दे याबाबत चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिनांक ०३/०१/२०२३ च्या आदेशान्वये दिले आहेत. त्यानुसार चौकशी अधिकारी यांनी दिनांक १७/०५/२०२३ रोजी चाचणी लेखापरीक्षण अहवाल सादर केला आहे.

सदर अहवालामध्ये NPA तरतूद, अनिष्ट तफावत, संस्थेचे उणे स्वभांडवल, उणे CRAR, भांडवलाचे उणे मुल्यांकन इ. मुद्यांबाबत दोष दुरूस्ती अहवाल सादर करण्याच्या सुचना संस्थेच्या सचिवास देण्यात आलेल्या आहेत. मात्र संस्थेच्या सचिवांनी सदर दोष दुरूस्ती अहवाल सादर न केल्यामुळे त्यांच्यावर प्रती वर्ष रू. ५०००/- प्रमाणे एकूण रू. १५०००/- ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन योजनांना देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत

**(२६) ५८३०० (२५-०४-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी पाणीपुरवठा संस्थान यांना दिनांक १९/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार शासनाकडून २५ टक्के शासकीय अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासननिर्णय होण्याआधी ज्या सहकारी पाणीपुरवठा संस्था स्थापन झाल्या आहेत अशा संस्थाना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने या संस्थाना या योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी आर्थिक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेवून सदरील शासन निर्णयापूर्वी स्थापन झालेल्या संस्थानाही शासनाने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०९-२०२३) :**(१) होय.

(२) व (३) शासनाच्या दिनांक १९/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार उपसा जलसिंचन सहकारी संस्थांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या २५ % किंवा १ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल ते अनुदान वितरीत केले जाते. सदर शासन निर्णयामध्ये या योजनेच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च अंतर्भुत नसल्याने कोणत्याही संस्थेस देखभाल दुरूस्तीसाठी अनुदान देण्यात आलेले नाही.

सहकारी उपसा जलसिंचन संस्थाच्या देखभाल दुरूस्तीसाठी अनुदान उपलब्ध करून देणेबाबतची मागणी शासनाकडे तसेच क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात काही जिल्ह्यात केळीला थंडीचा फटका बसल्याने केळी उत्पादकांचे मोठे नुकसान झाल्याबाबत

**(२७) ५८६४५ (१९-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना २०२२-२३ (आंबिया बहार) योजना दिनांक १३ जानेवारी, २०२३ पर्यंतच्या महावेध माहिती (डेटा) नुसार ४९ महसूल मंडळात सलग तीन दिवस किमान तापमान ८ डिग्री सेल्सीयस व त्यापेक्षा कमी राहिल्याने जिल्ह्यातील केळीला थंडीचा फटका बसल्याने केळी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वरणगाव (ता.भुसावळ) या गावाचा समावेश नुकसान झालेल्या गावांमध्ये करण्यात आला नाही, तसेच रावेर (जि.जळगांव) येथे तहसीलदार कार्यालयात केळी फळपीक विमा योजनेचे अनेक शेतकऱ्यांचे अनुदान गेले तीन महिन्यांपासून विमा कंपनीकडून खात्यावर जमा होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात केळी उत्पादकांची वांरवार होणारी पीक पडताळणी रद्द करण्यात यावी अशी केळी उत्पादक शेतकऱ्यांसह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जळगाव जिल्ह्यात या वर्षी आंबे बहार हंगामातील केळी फळाचा जवळपास ७७ हजार शेतकऱ्यांनी ८१ हजार हेक्टर क्षेत्रावर विमा काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी तापमान निकषांमध्ये जिल्ह्यातील ८६ पैकी ५१ महसूल मंडळ विम्यासाठी पात्र झाल्यानंतर विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना डावलण्यासाठी वारंवार पीक पडताळणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच केळी उत्पादक शेतकऱ्यांचे विमा योजनेचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२०-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेतंर्गत अधिसूचित ५५ महसूल मंडळात कमी तापमानाचा हवामान धोका लागू झाला आहे.

(२) हे खरे नाही.

पुर्नरचित हवामान आधारित फळपिक विमा योजना ही महसूल मंडळ घटक धरुन राबविण्यात येते. अंबिया बहार २०२१-२२ मध्ये वरणगाव (ता. भुसावळ) या महसूल मंडळातील ६३५ शेतकऱ्यांनी योजनेत केळी या फळपिकासाठी सहभाग घेतला असून सहभागी सर्व शेतकऱ्यांना एकूण रू.४.६७ कोटी विमा नुकसान भरपाई विमा कंपनीकडून अदा करण्यात आली आहे.

रावेर तालुक्यात पुर्नरचित हवामान आधारित फळपिक विमा आंबिया बहार २०२१-२२ मध्ये एकूण १९,५७५ शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला असून सहभागी सर्व शेतकऱ्यांना एकूण विमा नुकसान भरपाई रू.१३४.३४ कोटी विमा कंपनीकडून अदा करण्यात आली आहे.

तथापि, आंबिया बहार २०२१-२२ मधील रावेर व मुक्ताईनगर तालुक्यातील ६६ शेतकऱ्यांचे विमा अर्ज बँकेमार्फत विलंबाने पिक विमा पोर्टलवर प्राप्त झाल्याने विमा कंपनी मार्फत विमा नुकसान भरपाई रक्कम रू.४६.९७ लाख विलंबाने अदा करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) नाही, हे खरे नाही.
(६) आंबिया बहार सन २०२२-२३ मध्ये जळगाव जिल्ह्यातील ७७,८६० केळी उत्पादक शेतकऱ्यांनी ८१,५१०.१० हे. क्षेत्राकरिता विमा संरक्षण घेतले असून क्षेत्रीय तपासणी झालेल्या अर्जदारांपैकी ४२,५९४ शेतकऱ्यांना रक्कम रु.३२५.०७ कोटी इतकी विमा नुकसान भरपाई देय आहे. अद्याप ३२,५४७ अर्जदारांची क्षेत्रीय तपासणी सुरु असून क्षेत्रीय तपासणी पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांची विमा परिगणना विमा कंपनीमार्फत करण्यात येऊन विमा नुकसान भरपाई अदा करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे सात्विणगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे वणवा विझवणाऱ्या कर्मचाऱ्यांना केलेली मारहाण

**(२८) ६१६५२ (२१-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सात्विणगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे डोंगरात लागलेला वणवा विझवण्याचा प्रयत्न करणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना जमावाने मारहाण केल्याने दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास तीन वनरक्षक जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे कोकणात डोंगर जाळण्यात येत असल्याच्या प्रकारामुळे दरवर्षी हजारो एकर जमिनींतील वनसंपदा, आंबा-काजूच्या बागायती, वन्यजीवसंपदा ओसाड होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार जाणीवपूर्वक वणवे लावून निसर्ग व पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०२३) :** (१) दिनांक २८.०१.२०२३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे सात्विणगाव, ता. खेड येथील सरकारी वनक्षेत्राकडे मौजे बोरज व दाभिल गावाकडून वणवा येत असल्याची माहिती मिळाली होती.

सदरचा वणवा विझवतांना अज्ञात इसमांच्याकडून झालेल्या हल्यात दोन वनरक्षक जखमी झाले होते.

(२) रत्नागिरी (चिपळून) वन विभागात सन २०२० ते सन २०२२ पर्यंत एकूण १३ वन वणव्याच्या घटना घडल्या असुन ५६.५८ हे.आर. क्षेत्र जळीत झालेले आहे.

(३) दिनांक २८.०१.२०२३ रोजीच्या घटनेच्या अनुषंगाने वनरक्षक काडवली यांनी त्यांचेकडील वनअपराध क्र.०१/२०२३ दिनांक २८.०१.२०२३ अन्वेय भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये ज्ञात ०३ व अज्ञात सुमारे २० ते २२ इसमांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

वनक्षेत्रात आग लावणे किंवा वनक्षेत्रामधुन विस्तवाची ने आण करेल,किंवा वणवा पेटता राहू देईल व वनास आगीपासून धोका होईल असे कोणतेही कृत्य केल्यास त्यांच्यावर भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये कार्यवाही केली जाते तसेच वनसंपदा जपण्यासाठी सर्व उपाय योजना केल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सोनगांव (ता.जि.सातारा) सं.निंब येथील जमिनी या जात इनाम वर्ग २ च्या असून फेरफार नंबर १२१३ ने जात इनाम रद्द करुन पूर्ण सारा (भर आकाराने) जमिनी वहिवाटदारांच्या नावे नोंद करण्याबाबत**

**(२९) ६१७२५ (२१-०४-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनगांव (ता.जि.सातारा) सं.निंब, येथील शेतक-यांचे एकूण क्षेत्रापैकी ६४९ गट व वेगवेगळया प्रकारे भोगवटा वर्ग २ (दुमला) असे संबोधण्यात येत असून यामध्ये व इतर हक्कात सक्षम प्राधिकराराच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतर बंदी देवस्थान इनाम व वतन जमिनी असा शेरा सन २०१८ मध्ये ७/१२ वर दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच येथील स.निंब चे कडई पत्रक, ऑलिनेशन, पिटिआर उतारा इ. पाहता सदरच्या जमिनी या जात इनाम वर्ग २ च्या असून फेरफार नंबर १२१३ ने जात इनाम रद्द करुन पूर्ण सारा (भर आकाराने) जमिनी वहिवाटदारांच्या नावे नोंद करण्याबाबत मंजूरी मिळाली असतांनाही दिनांक ६ फेब्रुवारी, १९६० मध्ये वा त्यादरम्यान मे. लक्ष्मण गंगाधर स्वामी यांच्या सांगण्यावरुन फेरफार नंबर १५३१ ने जमिन देवस्थान इनाम वर्ग ३ करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरफार नंबर १४१३ पाहता सदर फेरफार मध्ये कोणताही शेरा दाखल करण्याबाबत आदेशित केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून दुरुस्ती आदेश होऊन सातबारावर नोंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :**(१), (२), (३) व (४) उक्त विषयाबाबत यापूर्वी अतारांकित प्रश्न क्र.११३६४ बाबत उपजिल्हाधिकारी सातारा यांनी कळविल्यानुसार सदर जमिनी खाजगी इनाम वर्गाच्या असल्याचा अहवाल विचारात घेऊन प्रस्तुत जमीनींच्या इतर हक्कात असलेला "देवस्थान इनाम जमीन" हा शेरा वगळण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ नुसार विहित कार्यवाही अवलंबून दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे विधानमंडळास कळविण्यात आले आहे.

आता अधिक तपासणी दरम्यान मौजे सोनगाव येथील एकूण गटांपैकी ५८४ गट देवस्थान इनाम वर्गातील असल्याचे आढळून आले आहे. तसेच सदर गटांच्या संगणकीय ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग २ (देवस्थान इनाम जमीनी) असा नमूद शेरा दुरुस्त करण्याची आवश्यकता नसल्याचा अहवाल सादर केलेला आहे.

तसेच फेरफार क्र. १५३१ नुसार लक्ष्मण गंगाधर स्वामी यांच्या ताब्यातील जमीनी जात इनाम वर्ग २ च्या आहेत असे समजून उक्त जमीन फेरफार क्र. १४१३ अन्वये नुसार खालसा करण्यात आल्याचे दिसून येते.

याशिवाय उक्त जमीनी खालसा झाल्यानंतर तत्कालीन मुंबई सरकार आदेश दि. १६/१०/१९५९ व जिल्हाधिकारी, सातारा आदेश दिनांक २१/११/१९५९ नुसार सदर जमीनी देवस्थान ईनाम वर्ग ३ च्या असल्याच्या आदेशाबाबत उल्लेखही फेरफार क्र. १५३१ मध्ये आढळून येतो.

सदर मिळकतीच्या हस्तलिखीत ७/१२ मध्ये दुमाला असा भोगवटा वर्ग नमूद होता. तथापि संगणकीय प्रणालीमध्ये असा दुमाला भोगवटा वर्ग उपलब्ध नसल्याने वरील वस्तुस्थितीनुसार सदर जमीनीच्या संगणकीय ७/१२ मध्ये भोगवटादार वर्ग २ देवस्थान इनाम जमीन हा प्रकार निवडण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आटपाडी (जि.सांगली) तहसील कार्यालयामध्ये खासगी व्यक्ती/एजंट यांची शासकिय कामकाजात हस्तक्षेप होत असल्याबाबत

**(३०) ६१९०८ (२१-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तहसील कार्यालयामध्ये खासगी व्यक्ती शासकीय कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसील कार्यालयाच्या अनेक विभागांमध्ये खाजगी एजंट म्हणून काम करणाऱ्यांना लवकरात लवकर हटवावे, अशी मागणी भारतीय शेतकरी कामगार पक्षातर्फे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग, संजय गांधी निराधार योजना, निवडणूक शाखा, महसूल शाखा एक, इ-कक्ष, फेरफार विभाग, यासह अन्य विभागामध्ये अनेक खाजगी एजंटचा वावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०७-२०२३) :** (१),(२), (३) व (४) श्री.भाई अमित गिड्डे, तालुका अध्यक्ष, शेतकरी कामगार पक्ष, ता. खानापूर, जि. सांगली यांचे अशा आशयाचे निवेदन तहसीलदार आटपाडी यांना प्राप्त झाले आहे.

तथापि, तहसिल कार्यालय आटपाडी येथे कोणतीही खाजगी व्यक्ती एजंट म्हणून कार्यरत नसल्याचे जिल्हाधिकारी सांगली यांच्या अहवालावरुन दिसून येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर व अमरावती विभागातील नझूल भाडेपट्टा जमिनीबाबत स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत

**(३१) ६२८१३ (२१-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर आणि अमरावती विभागामध्ये मोठया प्रमाणावर नझूल जमिनी भाडेपट्टयावर देण्यात आल्या असून इंग्रजांनी सुरु केलेली ही पध्दत आजही कायम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचा फटका सर्वसामान्यांना बसत असून नझूल भाडेपट्टयाचे हस्तांतरण, व्यापारात बदल, शर्ती भंग आणि नियमितीकरण याबाबत नागरीकांना अडचणी येत आहेत, त्यांना अनेक विभागाना चकरा माराव्या लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सर्वसामान्यांना होणारा त्रास लक्षात घेता येथील नझूल जमिनीबाबत स्वतंत्र विभाग स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०९-२०२३) :** (१) नागपूर व अमरावती या विभागामध्ये नझुल जमिनी विविध प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या असून, याबाबत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार जमिनीचे नुतनीकरण करणे, शर्तभंग नियमानुकुल करणे, भूभाडे आकारणे इ.बाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) नाही, नझुल जमिनीच्या भाडैपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण वापर बदल, शर्तभंग नियमीतीकरण इ. करिता शासन निर्णय दिनांक २३.१२.२०१५ व दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तुत धोरणात्मक निर्णयांव्दारे विहीत कार्यपध्दती प्रमाणे नागरिकांची प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत. त्यात नागरिकांना अनेक विभागांच्या चकरा माराव्या लागतात अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) नझुल जमिनी संदर्भात भाडेपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण, वापर बदल इ. संदर्भात जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यांचे मार्फत स्थानिक स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
नझुल जमिनींबाबत महसूल विभागांतर्गत कार्यासन ज-८ व ज-९ अशी दोन कार्यासने अनुक्रमे नागपूर व अमरावती विभागातील जमिनी संदर्भातील प्रकरणे हाताळण्यासाठी स्वतंत्र रित्या कार्यरत आहेत. सदर कार्यासनां मार्फत नागपूर व अमरावती विभागातील नझुल जमिनीबाबत धोरणात्मक निर्णयाचे कामकाज हाताळण्यात येते. यास्तव स्वतंत्र विभाग करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नामांतर राजगड करण्याबाबत

**(३२) ६४६८३ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), अ‍ॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेने दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास ‘वेल्हे’ तालुक्याचे नामांतर ‘राजगड’ करण्याबाबतचा ठराव मंजूर केला असून, ७० पैकी ५८ ग्रामपंचायतींनी नामांतराला पाठींबा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेल्हे आणि महाराष्ट्रातील जनतेच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याची पहिली राजधानी असलेल्या किल्ले राजगडाबद्दल आदराचे स्थान असल्यामुळे वेल्हे तालुक्याचे नामांतर राजगड करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.महसूलमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्रस्तावावर व जनतेच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :**(१) होय.
(२) होय.

(३) तालुका नामांतराची बाब ही धोरणात्मक असल्याने याबाबत विधी व न्याय विभागाच्या सहमतीने पुढील नियमोचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महानंद डेअरीने कॉस्ट कटिंगच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(३३) ६४७८० (२४-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानंद डेअरीने दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास कॉस्ट कटिंगचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानंदाने दुधाचे संकलन वाढवून व वितरण प्रणाली सक्षम करून नफा वाढविण्याचे धोरण न स्विकारता कॉस्ट कटिंगचा निर्णय घेण्यामागची कारणे कोणती आहेत,
(३) असल्यास, या कॉस्ट कटिंग नंतर महानंद डेअरीची आर्थिक स्थिती काय असणार आहे, तसेच बाजारपेठेच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व गुजरात पॅर्टन प्रमाणे महानंद हा महाराष्ट्रचा एकच ब्रँड निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत महानंदाला सदस्य संघाकडून आवश्यकतेपेक्षा जादा दुधाचा पुरवठा होत असून, वरवंड येथील दूध भूकटी प्रकल्पाला पाठविण्यात येत आहे. तथापि सदस्य संघाकडून होणारा दूध पूरवठा हा अनियमित स्वरूपाचा आहे. त्यामुळे महासंघास काही वेळा अपूरा दूध पुरवठा होतो. त्याचा परिणाम महासंघाच्या विक्री व्यवस्थेवर दिसून येतो.
(३) महानंदाचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी शासनाने दिनांक ०६.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दूध भुकटी व बटरच्या स्वरूपात सुमारे रु.७० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महसूल विभागातील प्रांत, तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्या न्याय्य मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत,**

**(३४) ६४९१६ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यातील नायब तहसिलदारांनी राजपात्रित अधिकारी म्हणुन वर्ग दोन श्रेणीचे वेतन मिळावे या मागणीसाठी बेमुदत संप पुकारला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महसूल विभागातील प्रांत, तहसीलदार, नायब तहसीलदार यांनी सुरु केलेल्या संपाबाबत तोडगा काढण्यासाठी मा.महसूलमंत्री यांनी दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संपात २२०० नायब तहसिलदार व ६०० तहसिलदार सहभागी झाल्याने राज्याच्या अप्पर तालुक्यात कामकाज ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील नायब तहसिलदार आणि तहसिलदार यांच्या सुरु असलेल्या काम बंद आंदोलनामुळे प्रशासकीय सेवा विस्कळीत होऊन राज्यातील ३५८ तालुक्यातील महसूल विभागाचे कामकाज ठप्प झालेले असल्याने, सदरहू मागणीबाबत योग्य तो निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय कामकाज ठप्प होऊ नये याकरीता आवश्यक ती उपाययोजना करुन राज्यातील तहसिल कार्यालयातील कामकाज सुरळीत चालु ठेवण्यात आले होते.
तसेच, महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखाली "नायब तहसिलदार" या संवर्गाचा ग्रेड पे ४३००/- वरुन रु. ४६००/- करण्याच्या अनुषंगाने याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने त्या विभागाचे दिनांक ११.०८.२००४ व दिनांक १३.०२.२०२३ रोजीचे शासन निर्णय विचारात घेवून, तपासणी करण्याबाबत अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथे उपवन विभाग भोर हे स्थलांतरीत करण्याच्या शासनाच्या निर्णयाबाबत

**(३५) ६६३४३ (२४-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे उपवन विभाग अंतर्गत भोर, नसरापूर, वेल्हे व सासवड या चार वनक्षेत्राचा समावेश असून हा विभाग शासनाने स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विभागाला मिळणाऱ्या निधीमुळे येथील लोकांना रोजगार निर्मिती होते, तसेच हा भाग दुर्गम असल्याने पीक नुकसान, पशुधन हानी, आरागिरणी परवाना, जमिनीबाबत असलेले वाद, स्थानिक लोकांची कामे वेळेत करण्याच्या दृष्टीने भोर उपवन विभाग सुलभ असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे शासनाच्या सदरील निर्णयास स्थानिकांचा विरोध असून ते नाराजी व्यक्त करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शासनाने सदर निर्णय रद्द करुन येथील प्रशासनाचे काम अत्यंत प्रभावीपणे चालवण्यासाठी सहाय्यक वनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी या पदांची निर्मिती व्हावी व वनविभाग भार यांचे ठिकाण व आस्थापना पूर्वीप्रमाणेच ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०९-२०२३) :** (१) नाही, शासन निर्णय दिनांक २५.०५.२०२३ अन्वये वन विभागातील भोर उप वन विभागासह इतर उप वन विभागांचे लगतच्या वन विभागामध्ये समायोजन करण्यात आले आहे.

(२) पुर्वीप्रमाणे उक्त भोर उप वन विभागास निधी मिळणार आहे. भोर उप वन विभागामध्ये राबविण्यात येणा-या योजना व योजनेत्तर कामे पुर्वीप्रमाणे सुरु राहतील.
(३) नाही.
(४) भोर उप वन विभागाचे कार्यालयात पुर्वीप्रमाणे सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक) हे कार्यालय प्रमुख म्हणुन कामकाज पाहतील. त्यांचे कार्यालय व आस्थापना पुर्वीप्रमाणेच सुरु राहील. सदर कार्यालय उप वनसंरक्षक, पुणे व मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे यांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथे उपविभागीय वनअधिकारी, उपविभाग भोर लगतच्या वनविभागाचा समावेश न झाल्याबाबत**

**(३६) ६६४०१ (२५-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील उपवनविभागांतर्गत भोर, वेल्हे व पुरंदर या ३ तालुक्याचा समावेश असून यामध्ये भोर, नसरापूर, वेल्हे व सासवड या चार वनपरिक्षेत्रांचा समावेश असल्याने भौगोलिकदृष्टया उपविभागीय वन अधिकारी भोर हे कार्यालय भोर या ठिकाणीच योग्य आहे त्याचे स्थलांतर करण्यात येऊ नये तसेच उपविभागीय वनअधिकारी यांचा दर्जा पूर्वीप्रमाणे कायम रहावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणाबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०९-२०२३) :** (१) होय,
शासन निर्णय दिनांक २५.०५.२०२३ अन्वये वन विभागातील भोर उप वन विभागासह इतर उप वन विभागांचे लगतच्या वन विभागामध्ये समायोजन करण्यात आले आहे.
(२) भोर उप वन विभागाचे कार्यालयात पुर्वीप्रमाणे सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक) हे कार्यालय प्रमुख म्हणुन कामकाज पाहतील. सदर कार्यालय व आस्थापना पुर्वीप्रमाणेच सुरु राहील. सदर कार्यालय उप वनसंरक्षक, पुणे व त्यानंतर मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे यांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे.
(३) पुर्वीप्रमाणे भोर उप वन विभागास निधी मिळणार आहे. भोर उप वन विभागामध्ये राबविण्यात येणाऱ्या योजना व योजनेत्तर कामे पुर्वीप्रमाणे सुरु राहतील.
नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या दुधाळ जनावरांच्या योजनेच्या निकषामध्ये बदल करुन अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत**

**(३७) ६६४२९ (२८-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील दूध उत्पादनास चालना देण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या कृषी व पशुसंवर्धन विभागामार्फत शासन निर्णय क्र.जिवायो-२०२३/प्र.क्र.२१/पिुम-४,कृषि,पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई, दिनांक २७ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास दुधाळ जनावरांची योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या लाभार्थी निवडीकरीता तीन निकष ठेवले असून यामध्ये महिला बचत गटातील लाभार्थी, अल्पभूधारक शेतकरी (१ ते २ हेक्टरपर्यंतचे भूधारक) तसेच सुशिक्षित बेरोजगार यांची नोंद शासनाच्या विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लाभार्थी निवडीच्या निकषातून अत्यल्प भूधारक शेतकरी यांना वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनेच्या लाभार्थी निवडीच्या निकषामध्ये बदल करुन अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचा देखील समावेश करण्यात यावा, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या निवडीसाठी दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, अत्यल्प भूधारक शेतकरी, अल्प भूधारक शेतकरी, सुशिक्षीत बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले) व महिला बचत गटातील लाभार्थी हे ०५ निकष निश्चित करण्यात आलेले असून, त्यांची नोंद पशुसंवर्धन विभागाकडे करण्यात येत नाही.

मात्र जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रमाणेच राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेचा लाभ अत्यल्प भूधारक शेतकरी व दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांनाही देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ११.०९.२०२३ रोजी घेतला आहे.

---

**सातपाटी मच्छिमार बंदरातील गाळ काढण्यासाठी कमीत कमी रॉयल्टी आकारुन परवानगी देण्याची शिफारस केल्याबाबत**

**(३८) ६६४९४ (२७-०८-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपाटी मच्छिमार बंदरातील जेट्टी समोरील नौकानयन मार्गातील गाळ काढण्यासाठी कमीत कमी रॉयल्टी आकारुन परवानगी देण्याची शिफारस मा. आयुक्त (कोकण विभाग) महसूल यांनी शासनास केली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळमुक्त मच्छिमार बंदरे-खादी हे धोरण शासन राबविण्यास दिरंगाई करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कमीत कमी रॉयल्टी आकारुन परवानगी देण्याकरीता व गाळमुक्त मच्छिमार बंदरे व खादी हे धोरण राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०९-२०२३) : (१)** हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासनाच्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार निश्चित करण्यात आलेले वाळू/रेती गट वगळता महाड व चिपळूण शहरासारखी कोकणातील इतर शहरात पूरपरस्थिती निर्माण होऊन जिवीत व वित्तीय हाणी टाळण्याकरिता अशा नदी/खाडीपात्रातील गाळ व गाळयुक्त बेटाचे निष्कासन करणे आवश्यक असल्याने, त्यासाठी नदी/खाडी पात्रातील गाळ व गाळाची बेटे निष्कासन करताना निघणा-या गौण खनिजास स्वामित्वधनातून सूट देण्याबाबत व सदर ठिकाणच्या गाळातून निघणा-या गौण खनिजाचा वापर व्यावसायिकदृष्ट्या करावयाचा झाल्यास अशा गौण खनिजावर शासनाच्या प्रचलित नियमानुसार स्वामित्वधनाची आकारणी करण्याबाबतचे धोरणात्मक शासन पत्र दिनांक ०४/०४/२०२३ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांना कळविले आहे.

---

## राज्यातील कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(३९) ६७१९० (२७-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी सेवक हे तुटपुंज्या रुपये सहा हजार मानधनावर कृषी सहाय्यकांच्या बरोबरीने शासन व शेतकरी यांच्यातील दुवा म्हणून कार्य करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्याकरिता कृषी पदवीधर युवा शक्ती संघटना यांनी शासनास मागील अडीच वर्षे वारंवार निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२३ च्या दरसूचीनुसार रोजगार हमीवरील मजुराला दररोज रुपये २७३, तर काम करुन घेणाऱ्या कृषी सेवकाला मात्र फक्त रुपये २०० दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी तुटपुंज्या मानधनावर नोकरी करणाऱ्या कृषी सेवकांच्या मानधनवाढीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने कृषि विभागातील कृषि सहाय्यकांची पदे सुरुवातीस कृषि सेवक म्हणून रु.२५००/- या निश्चित वेतनावर भरण्याचा धोरणात्मक निर्णय या विभागाच्या दिनांक ०६.०२.२००४ व दिनांक १७.०२.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तद्नंतर दिनांक १९.०३.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०४.२०१२ पासून कृषिसेवकांच्या निश्चित वेतनामध्ये रु.२५००/- वरुन रु.६०००/- एवढी वाढ करण्यात आली.

कृषि सेवकांना नियमित कृषि सहाय्यक पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असून कृषिसेवक/कृषि सहाय्यक कृषि विभागातील क्षेत्रिय स्तरावर कार्यरत असणारा शासन व शेतकरी यांच्यामधील दुवा आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने कृषि सेवकांच्या निश्चित वेतनामध्ये वाढ करण्याबाबत शासनास निवेदने प्राप्त झालेली होती.

मा.मंत्रीमंडळाने दिनांक २७.०७.२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार कृषि सेवकांच्या निश्चित वेतनात(एकत्रित मानधन) रु.६०००/- वरुन रु.१६०००/- एवढी वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून नवीन जिल्ह्याच्या निर्मितीच्या मागणीबाबत

**(४०) ६७२४२ (३१-०८-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून नवीन जिल्ह्याच्या निर्मितीची मागणी चिमूर येथील रहिवाश्याकडून अनेक वर्षापासून होत असल्याबाबतचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील चिमूर, नागभीड, व ब्रम्हपूरी तालुका वन्य व्याप्त असून नागपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्हयाचे अंतर लांब असल्याने व औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय अडचणीमुळे नवीन जिल्ह्याच्या निर्मितीमध्ये चिमूर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हापासून चिमूर, नागभीड व ब्रम्हपूरी तालुक्याच्या विकासाच्यादृष्टीने नवनिर्मित जिल्हयाच्या प्रलंबित प्रस्तावाला मान्यता देऊन विकास कामाला गती व चालना देण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :**(१) होय.

(२) व (३) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्हयांचे विभाजन/ पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा पुनर्रचना समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यानुषंगाने सदर समितीने जिल्हा विभाजन/ निर्मितीचा अहवाल दिनांक १६.११.२०१६ रोजी शासनास सादर केला आहे. नवीन जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असल्याने याबाबत विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी चिंचवड ( ता.हवेली,जि.पुणे) तहसील कार्यालयातील गावे स्वतंत्र करण्याकरता महाऑनलाईनकडे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(४१) ६७२६१ (२७-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (ता.हवेली, जि.पुणे) शहर परिसरातील काही गावे वगळून पिंपरी चिंचवड येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्यात आले, तथापि, राज्य शासनाच्या गॅझेटमध्ये या दोन्ही तहसील कार्यालयांचा कारभार वेगवेगळा सुरू असल्याचे दिसून येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेली तालुक्यातील गावे वगळून पिंपरी चिंचवड अप्पर तहसीलदार कार्यालयात समाविष्ट करून आठ ते दहा वर्षाचा कालावधी उलटला तरीही राज्य शासनाच्या महाऑनलाईन प्रक्रियेत ही दोन्ही गावे अजूनही एकत्रित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाऑनलाईन प्रक्रियेत गावे एकत्र असल्यामुळे दोन्ही तालुक्यातील दाखल्यांसाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणावर तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत असून राज्यात दिनांक १९ मे, २०२३ पासून महाऑनलाईन प्रणाली सुरू करण्यात आल्याने प्रथम अर्ज करणाऱ्याला प्रथम दाखला देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाऑनलाईन प्रणालीमध्ये गाव एकत्रित असल्याकारणाने पिंपरी-चिंचवड अप्पर तहसीलदार कार्यालयच्या हद्दीतील महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांना अर्जांवर प्रक्रिया करण्याचा अधिकार असताना मध्येच हवेलीतील अर्ज आल्याने त्यावर निर्णय घेणे अवघड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हवेली तहसिलदार कार्यालयीन गावे स्वतंत्र करण्याकरिता महाऑनलाईनकडे मंजुरीअभावी प्रलंबित असलेला प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :**(१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.प्राफेब - २०१०/व्हीआयपी २७७/पुनर्बांधणी ३/प्र.क्र.१५१/म-१०, दिनांक ०८.०२.२०१३ अन्वये पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात अपर तहसीलदार कार्यालय, पिंपरी चिंचवड सुरु करण्यात आले आहे. सदर कार्यालयांतर्गत एकुण ३० गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) प्रथम दाखल होणाऱ्या दाखल्यावर प्रथम निर्णय घेणे या तत्वानुसार FIFO- First In First Out प्रणाली महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाकडून लागू करण्यात आलेली होती. महाऑनलाईन पोर्टलवर तहसील कार्यालय, हवेली व अपर तहसील कार्यालय, पिंपरी चिंचवड या कार्यालयांच्या दाखल्यांचे स्टोरेज एकाच ठिकाणी असल्याने फिफो पध्दतीने दाखल्यांवर कामकाज करताना अडचणी येत होत्या. त्यानुषंगाने सदर दोन कार्यालयांसाठी स्वतंत्र लॉगीन तयार करणेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक ०५.०६.२०२३ च्या पत्रान्वये प्रकल्प व्यवस्थापक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रस्तुत प्रकरणी मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांना त्यांच्यास्तरावरून व्यवस्थापकीय संचालक, माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांना सुचना देण्याची विनंती केलेली आहे.

फिफो प्रणाली दिनांक १६.०६.२०२३ पासून बंद झाल्याने संबंधित तहसिलदार कार्यालयांना अर्जावर निर्णय घेता येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळूज (ता.मोहळ,जि.सोलापूर) येथे भोगावती-नागझरी या नद्या व ओढ्या वरुन वाळूचा मोठया प्रमाणात उपसा केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याबाबत**

**(४२) ६७६४८ (२७-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज (ता.मोहळ,जि.सोलापूर) येथे भोगावती-नागझरी या नद्या व ओढ्या वरुन वाळू माफियांकडून वाळू उपसा सुरु असल्याने पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात उपसा करताना भोगावती नदीत घुसलेल्या टेम्पोच्या मदतीला आलेला टॅक्टर महसुल विभागाने ताब्यात घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नद्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मौजे वाळूज हद्दीतील भोगावती नदीमधून दिनांक २२/०२/२०२३ रोजी १.५ ब्रास वाळूची अवैध रित्या वाहतूक करताना एक टॅम्पो व विना क्रमांक ट्रॅक्टर हेड जप्त करुन त्यावर अनुक्रमे रु.१,५३,४००/- व रु.१,००,०००/- दंडात्मक रक्कमेची आकारणी केली आहे. संबंधीत ट्रॅक्टर धारक यांनी दंडात्मक रक्कमेचा भरणा करुन बंधपत्र दिल्यानंतर ट्रॅक्टर मुक्त केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

सोलापूर जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी माहे एप्रिल २०२२ ते मे,२०२३ या कालावधीत एकूण ८४५ प्रकरणात रु.९११७.२७/- लाख इतक्या दंडाची आकरणी करण्यात येवून ६०३ गुन्हे दाखल केले आहेत.

---

## विदर्भात खत कंपन्यांनी खताच्या पिशवीसोबत सल्फर मॅक्स खताच्या पिशव्या विकत घेण्यास खत विक्रेत्यांना बंधनकारक केल्याबाबत

**(४३) ६७९८८ (२७-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात खरीप हंगामात नामांकीत खत कंपन्यांकडून १० टन १०:२६:२६ खतासोबत ५ टन २०:२०:०:१३ खत, ५ टन १४:३५:१४ सोबत सल्फर मॅक्स खताच्या ५ पिशव्या विकत घेण्यास खत विक्रेत्यांना बंधनकारक केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खतांच्या लिकींगमुळे शेतकऱ्यांना आवश्यक नसलेली खते विकत घेतल्याने आर्थिक नुकसान होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

विदर्भात अमरावती व नागपूर या दोन कृषि विभागाचा समावेश होतो. यापैकी अमरावती विभागात खामगाव, जि.वाशिम, ता.बुलढाणा येथे नामांकित कंपनीकडून संयुक्त खतासोबत सल्फर मॅक्स खताच्या ५ पिशव्या विकत घेण्यास खत विक्रेत्यांना बंधनकारक करण्यात येत असल्याची बाब बुलढाणा कृषि साहित्य विक्रेता संघटनेने निदर्शनास आणली आहे

(२) हे खरे नाही.

उक्त खतांच्या लिंकींगबाबत जिल्हयातील शेतकऱ्यांकडून कृषि आयुक्तालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) सदर प्रकरणी सर्व रासायनिक खत कंपनी प्रतिनिधी व कृषि निविष्ठा प्रतिनिधी यांना रासायनिक खतासोबत इतर ग्रेडच्या खताची सक्ती न करण्याच्या, खते पोच देणे, भाडे वेगळे न आकारणे याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा व आयुक्त (कृषि) यांनी सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील कोविड-१९ लॉकडाऊनमुळे नुकसानग्रस्त ८६ मच्छीमार संस्थांच्या सभासदांची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(४४) ६८३४२ (२४-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील कोविड-१९ लॉकडाऊनमुळे नुकसानग्रस्त ८६ मच्छीमार संस्थांच्या सभासदांची नुकसान भरपाई मागील ३ वर्षापासुन प्रलंबित असल्याचे माहे जुन, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, गडचिरोली यांनी त्यांच्या दिनांक ३ एप्रिल, २०२० रोजीच्या पत्रान्वये आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.मत्स्य/सा/०५३१०१/२५७/२०१९-२०, दिनांक ३१/०३/२०२० रोजीच्या पत्राचा संदर्भ देऊन जिल्हयातील नोंदणीकृत मासेमारी संस्थांकडुन सभासदांच्या बँक खात्याची विहीत नमुन्यात माहीती मागविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मासेमारी संस्थांच्या सभासदांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) खरे आहे .

केंद्र शासनाने दिनांक ३०.०३.२०२० रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये कोविड १९ या कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील क्रियाशील मच्छिमारांची माहिती त्यांचा आधारकार्ड क्रमांक व बँक खात्याची माहिती मागविली होती. सदर माहिती हि कोणत्याही नुकसान भरपाईकरिता मागविण्यात आलेली नव्हती.

(३) कोविड कालावधीमध्ये शासनाने दिनांक ९.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ३०.०६.२०१७ व दिनांक ०३.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे ठेक्याने दिलेल्या तलावांची सन २०२१-२२ या वर्षाची तलाव ठेका रक्कम माफ करण्यात आलेली आहे.

एकूण ३३ मच्छिमार सहकारी संस्थेच्या ६२६६ एवढ्या सदस्यांना व २ खाजगी ठेकेदारांना रु.४२,९०,१४९/- इतकी तलाव ठेका रक्कम माफ करण्यात आली आहे. यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थाना देण्यात आलेल्या तलाव ठेका माफीचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा तहसीलमधील लिपिकाच्या मोबाईलवर कोतवाल भरतीच्या प्रश्नांच्या उत्तराचा स्क्रीनशॉट आल्याबाबत

**(४५) ६८४९८ (३१-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा तहसीलमधील कोतवाल पदाच्या भरतीप्रक्रियेअंतर्गत दिनांक २८ मे २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी परीक्षा घेण्यात आली होती या परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांच्या उतरांचा स्क्रीनशॉट सर्वप्रथम जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपिकाच्या मोबाईलवर आल्यानंतर त्यांनी तो स्क्रीनशॉट इतर परीक्षार्थीला पाठवून गैरप्रकार केल्याचे दिनांक ८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरती प्रक्रियेची प्रश्न पत्रिका व उत्तर पत्रिका ही गोपनिय असतांना ती मोबाईलवर व्हायरल झाल्याने या गैरप्रकारात काही अधिकाऱ्यांचाही हात असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने संबंधितावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) दिनांक २९.०५.२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील लिपिकाने सांगितल्यानुसार, परीक्षा संपन्न झाल्यानंतर उत्तरे लिहिलेला परीक्षेदरम्यानचा स्क्रीनशॉट भ्रमणध्वनीवर प्राप्त झाल्याचे निदर्शनास आणले त्याअनुषंगाने अध्यक्ष तथा उपजिल्हाधिकारी सामान्य-२, तहसिलदार, भंडारा यांनी पेपर लीक झाल्याच्या संशयाने तात्काळ मा.पोलीस अधिक्षक यांचेकडील सायबर गुन्हे कक्षाच्या सहाय्याने तपासणी व चौकशी केली. तहसिलदार, भंडारा यांनी चौकशीअंती पोलीस स्टेशन, भंडारा येथे दिनांक ०६.०६.२०२३ रोजी अप.क्र.३०१/२०२३ गुन्हा दाखल केला.तसेच सदर परीक्षा तहसिल कार्यालयाकडील दिनांक ०९.०६.२०२३ रोजीच्या जाहिरसूचनेअन्वये रद्द करण्यात आली. तसेच पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, भंडारा यांच्या दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या प्रगती अहवाला अन्वये सद्यस्थितीत ०६ आरोपी अटक असून पुढील तपास सुरु आहे. यामध्ये अधिकारी किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांचा कोणताही सहभाग प्राथमिक तपासणीत दिसून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवण (जि. नाशिक) तालुक्यातील बेज शिवारात कोंबडयांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४६) ६८९८३ (२४-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि. नाशिक) तालुक्यातील बेज शिवारातील पोल्ट्रीफार्ममधील कोंबड्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत अज्ञात व्यक्तीने विषारी औषध टाकल्यामुळे पाचशे कोंबड्यांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औषधामुळे ४८८० कोंबड्यांना विषबाधा झाली असून संबंधित पोल्ट्रीचालकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने याप्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात तसेच पोल्ट्रीचालकास नुकसान भरपाई देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :**(१) व (२) श्री.सचिन रामचंद्र रौंदळ, रा.बेज, ता.कळवण, जि.नाशिक यांच्या पोल्ट्री फार्ममधील ३६८ कोंबड्यांचा दिनांक ९.०५.२०२३ रोजी Organophosphorus Insecticide Chlorpyriphos या विषबाधेने मृत्यू झाला असल्याचा अहवाल दिनांक १.०९.२०२३ रोजी प्राप्त झाला आहे.

(३) व (४) या प्रकरणी श्री.रौंदाळ यांनी दिनांक ९.०५.२०२३ रोजी पोलीस ठाणे कळवण, जि.नाशिक येथे एफआयआर क्र.०११३ दाखल केली असून, सदर प्रकरणी पोलीस ठाणे, कळवण यांच्याकडे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मदत व पुनर्वसन विभागाचा शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२३ अन्वये नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणारे जनावरे व कुक्कुट पक्षांना नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे. तथापि, सदर प्रकरणी कुक्कुट पक्षांचा मृत्यू विषबाधेने झाल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना अपघातातील विम्याऐवजी अनुदान देण्याबाबत**

**(४७) ६९३८९ (२४-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना शेती करताना होणाऱ्या अपघातांपासून संरक्षण देण्यासाठी विमासंरक्षण ऐवजी 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान' योजना लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी या योजनेंतर्गत अद्यापपर्यंत राज्यात किती शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत दिनांक ३१.०८.२०२३ पर्यत ५३३ लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(३) सदर योजनेतंर्गत शासन निर्णय दिनांक २०.०६.२०२३ अन्वये रु. १२.०० कोटी व दिनांक २८.०७.२०२३ अन्वये रु. १७.४५ कोटी असा एकूण रु. २९.४५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

प्रत्यक्ष लाभार्थी यांना रक्कम रु. ३.७९ कोटी इतक्या निधीचे वाटप करण्यात आलेले असून उर्वरीत लाभार्थ्यांची अर्ज पडताळणी, कागदपत्र पुर्तता बाबत कार्यवाही सुरु असून पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरणांची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यात खताचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(४८) ६९४३२ (२८-०८-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यासाठी कृषी विभागाने ६० हजार मेट्रीक टन युरियाची मागणी केली असता ४२ हजार ५८० मेट्रीक टन युरिया खत देण्याचा निर्णय घेतल्यामुळे खताचा तुटवडा जाणवल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त जिल्ह्यात खतांचा तुटवडा होणार नाही यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर जिल्हयात खरीप हंगाम २०२३ मध्ये युरिया खताची टंचाई नाही. खरीप हंगाम २०२३ करीता युरीया खताची मागणी ६०,००० मे. टन आहे. यापैकी युरीया खताचे ४२,५८० मे. टन आवंटन करण्यात आलेले आहे. दि. १ एप्रिल २०२३ रोजी २०,१७८ मे. टन शिल्लक युरीया खत व आवंटन ४२,५८० मे. टन असा एकूण ६२,७५८ मे. टन युरीया तसेच ५९,८१० बॉटल नॅनो युरिया आवंटन प्राप्त आहे. त्यामुळे नागपूर जिल्हयात युरीया खताचा तुटवडा निर्माण झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्हयात रेती ट्रेडींगच्या नावाखाली गोरखधंदा सुरु असल्याबाबत

**(४९) ६९५३३ (३१-०८-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (ता. तुमसर, जि. भंडारा) येथील गाव शिवारात मध्य प्रदेशातील एका रेती कंत्राटदाराने ट्रेडींगच्या नावावर मानवनिर्मीत डोंगर निर्माण केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल प्रशासनाने येथे ५० हजार ब्रास रेतीची परवानगी दिली असता येथे प्रत्यक्षात दोन लाख ब्रास रेतीचा साठा उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेतीच्या ट्रेडींगच्या नावाने अवैध रेती विक्री अनेक दिवसापासून सुरु असतानाही याप्रकरणी महसूल विभागातील अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०९-२०२३) :** (१),(२),(३),(४) व (५) हे खरे नाही.

तथापि मौजा पाथरी ता. तुमसर येथील गट क्र.१०४/१ मध्ये संबंधितास ५०००० ब्रास वाळुचे ट्रेडींग लायसन्स देण्यात आले आहे. दिनांक ०७.०७.२०२३ रोजी त्याठिकाणी १५७३२ ब्रास रेतीसाठा असल्याचे आढळून आले आहे.

---

## नागनाथ (ता.औंढा, जि.हिंगोली) येथील महाखानिज ॲप वरून ८००ब्रास वाळूसाठा एकाच दिवशी वितरित झाल्याबाबत

**(५०) ७०८५७ (११-०९-२०२३). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागनाथ (ता.औंढा,जि.हिंगोली) येथे महाखनिज ॲप वरुन ८०० ब्रास वाळूसाठा एकाच दिवशी वितरित केल्याबाबत ग्रामस्थांनी तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) महाखनिज ॲपवरून ८०० ब्रास वाळू साठा एकाच दिवशी वितरीत करून साठा गायब झाला याबाबतची ग्रामस्थांनी दिनांक २६.०६.२०२३ रोजी तक्रार/निवेदन प्राप्त झाले होते. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्षात रेती/वाळू डेपोमध्ये उपलब्ध साठ्याची खातरजमा ऑनलाईन प्रणालीव्दारे करण्यात आली आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे रेती/वाळू डेपो मधून ८०० ब्रास वाळूसाठा एकाच दिवशी वितरीत करण्यात आलेला नाही.

महाखनिज प्रणालीवर ऑनलाईन नोंदणी केलेल्या व्यक्तींना मौजे गोळेगाव ता. औंढा ना. येथील वाळू/रेती डेपो मधून नियमानुसार एकूण १३७३ ब्रास वाळूची विक्री करण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.